www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118



■ रस्ते विकासाशी निगडित सर्व विषय तातडीने मार्गी...
पान ३ वर....

दैनिक
# लोकरक्षणाय
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ




■ मुख्यमंत्री फडणवीस यांचा अधिकाऱ्यांसाठी...
पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक २१३ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, बुधवार, ०८ जानेवारी २०२५ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

# गतीमान आणि पारदर्शी कारभारासाठी महाराष्ट्रात राबविले जाणार 'ई कॅबीनेट' - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

● मुंबई, विशाल कारंडे :


**राज्यात 'ई कॅबीनेट' मध्ये होणारे निर्णय पोर्टलच्या माध्यमातून जनतेला उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील कारभार गतीमान आणि पारदर्शी करण्यावर भर दिला असून मंत्रिमंडळातील निर्णय लोकांपर्यंत तातडीने पोहचणे, सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्यावर भर दिला आहे. याबाबतचे सादरीकरण आज मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर केले.**



'ई-कॅबिनेट' हा राज्य शासनाचा पर्यावरणपूरक उपक्रम आहे. मंत्रिमंडळ बैठकीसाठी कागदांचा मोठ्या प्रमाणावर होणारा वापर कमी करण्यासाठी हे संपूर्ण आयसीटी (ICT) सोल्यूशन महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या हरित उपक्रमांतर्गत स्मार्ट टॅब्लेट्सद्वारे कागदविरहीत मंत्रिमंडळ बैठक सहज पार पडू शकेल. या प्रणालीमुळे मा. मंत्र्यांसाठी अत्यंत सुलभ डॅशबोर्ड उपलब्ध होतील. त्याचबरोबर आवश्यक संदर्भ शोधणे, कृती बिंदू (ॲक्शन पॉइंट) पाहणे आणि घेतलेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीबाबत पुनरावलोकन करणे सोपे होईल.

■ ई-कॅबिनेटमुळे मंत्रिमंडळ बैठकांचे, निर्णयांचे व त्यासंबंधीच्या दस्तऐवजांचे जतन होईल. मंत्रिमंडळ निर्णय आणि त्यासंबंधीचे संदर्भ शोधणे सहज शक्य होईल. ही प्रणाली पूर्णपणे डीजिटल स्वरूपात असून याद्वारे प्रत्येक टप्पा सहज पार पाडला जाईल. आतापर्यंत होत आलेल्या पारंपरिक मंत्रिमंडळ बैठकांमध्ये येणाऱ्या विविध अडचणींवर या प्रणालीमुळे मात करता येईल. मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात येणारा प्रस्ताव ऑनलाईन अपलोड करणे, तो मंत्रिमंडळासमोर चर्चेसाठी आणि निर्णयासाठी सादर करणे, त्यावर अंतिम निर्णय व त्याबाबतच्या सर्व नोंदी ठेवणे, ही सर्व प्रक्रिया सहजरित्या पार पडणार आहेत. हा सुशासनाच्या पूर्ततेतील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

## () थोडक्यात ()



### बलात्कार प्रकरणातील दोषी आसाराम बापूला अंतरिम जामीन मंजूर

**नवी दिल्ली :** एका महिला अनुयायीवर बलात्कार केल्याप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या आसाराम बापूला प्रकृतीच्या कारणास्तव सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. ८५ वर्षीय आसाराम बापूला ३१ मार्च पर्यंत अंतरीम जामीन मंजूर झाला आहे, पण या काळात त्यांना आल्या अनुयायांना भेटता येणार नाही, असेही निर्देश देण्यात आलेले आहेत. सध्या त्यांच्यावर जोधपूरच्या आरोग्य मेडीकल सेंटरमध्ये उपचार सुरू आहेत. जोधपूर मध्यवर्ती कारागृहात ते जन्मठेपेची शिक्षा भोगत आहेत.

### डॉन अरुण गवळीला २८ दिवसांची संचित रजा मंजूर



**नागपूर :** मुंबई उच्च न्यायालयाच्यानागपूर खंडपीठाने मंगळवारी मुंबईतील कुख्यात डॉन अरुण गवळीला २८ दिवसांची संचित रजा (फरलो) मंजूर केली. न्यायमूर्तीद्वय नितीन सांबरे व वृषाली जोशी यांनी हा निर्णय दिला.
गवळीने संचित रजेसाठी सुरुवातीला १८ ऑगस्ट २०२४ रोजी कारागृह उपमहानिरीक्षकांकडे अर्ज सादर केला होता. परंतु, गवळी गुन्हेगारांच्या टोळीचा म्होरक्या असल्याने व त्याला रजेवर सोडल्यास विधानसभा निवडणुकीच्या काळात कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता तो अर्ज १४ ऑक्टोबर २०२४ रोजी नामंजूर करण्यात आला होता. या आदेशाविरुद्ध गवळीने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावरील सुनावणीदरम्यान, गवळीचे वकील ॲड. मीर नगमान अली यांनी कारागृह उपमहानिरीक्षकांचा निर्णय अवैध असल्याचा दावा केला. यापूर्वी रजेवर सुटल्यानंतर गवळीने प्रत्येकवेळी कायदे व नियमांचे काटेकोर पालन केले.

## १ एप्रिलपासून फास्ट टॅग सर्व वाहनांकरिता बंधनकारक

● मुंबई, विशाल पाटील :

मुंबई- महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये १ एप्रिल २०२५ पासून राज्यात सर्व वाहनांसाठी फास्ट टॅग अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

फडणवीस सरकारच्या मंत्रिमंडळात शासनाच्या प्रचलित सार्वजनिक खासगी सहभाग धोरण-२०१४ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीत सुधारणा करण्याविषयीचा निर्णय घेण्यात आला आहे.

काही वर्षांपूर्वी महामार्गावर धावणाऱ्या वाहनांकडून टोल टॅक्स वसूल करण्यासाठी केंद्र सरकारकडून फास्ट टॅग प्रणाली लागू करण्यात आली आहे. देशात दुचाकी आणि तीनचाकी वाहने वगळता सर्व वाहनांकडून फक्त फास्ट टॅगद्वारे टोल



टॅक्स वसूल केला जातो. फास्ट टॅग हे वॉलेट असून ते थेट बँक खात्याशी जोडलेले असतात. हे वॉलेट वाहनचालकांना रिचार्ज करावे लागते.

अलीकडेच भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने फास्टॅगबाबत नवीन नियम जारी केला आहे. या अंतर्गत फास्टॅग वापरकर्त्यांना शक्य तितक्या लवकर केव्हायसी अपडेट करावे लागणार आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं 'एक वाहन, एक फास्ट टॅग' धोरण राबविण्याचा निर्णय घेतला आहे. पान २ वर

## आरोग्य विभागाचे खासगी रुग्णालयांवर 'लक्ष'!

### राज्यभरात नियमभंग शोधून कारवाईची मोहीम

● पुणे, अभिजीत येरल्लू :


राज्यातील खासगी रुग्णालयांची तपासणी करण्याचे पाऊल आरोग्य विभागाने उचलले आहे. यासाठीची नियमावली आरोग्य विभागाने तयार केली आहे. या नियमावलीनुसारच रुग्णालयांची तपासणी केली जाणार आहे. दरम्यान, डॉक्टरांना नाहक त्रास देऊ नये, अशी सूचनाही अधिकाऱ्यांना करण्यात आली आहे. राज्यातील सर्व खासगी रुग्णालयांची तपासणी आरोग्य विभागाकडून केली जाणार आहे. त्यात खासगी वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या आणि किमान एक रुग्णशय्या असलेल्या रुग्णालयांचा समावेश असेल. याचबरोबर ॲलोपथी, आयुष,





युनानी, नॅचरोपथी यासह सर्व शाखांच्या रुग्णालयांची तपासणी केली जाणार आहे. रुग्ण २४ तास दाखल करून घेतला जात नाही अशा डे केअर सेंटरचा यात समावेश नसेल. या तपासणीची पुणे विभागाचे आरोग्य उपसंचालक डॉ. राधाकिशन पवार यांनी नियमावली तयार केली आहे. ही तपासणी १५ दिवसांत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी महापालिकेचे आरोग्यप्रमुख, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि शल्यचिकित्सक यांना दिले आहेत. रुग्णालयाची बॉम्बे नर्सिंग होम ॲक्टनुसार नोंदणी झाली आहे का, याची तपासणी केली जाणार आहे. आशा, आरोग्यसेवक, आरोग्यसेविका नोंदणी नसलेल्या रुग्णालयांची यादी तयार करतील. या रुग्णालयांना नोंदणी करून घेण्यास सांगितले जाईल. डॉक्टरांनी दर वर्षी नोंदणी शुल्क भरणे बंधनकारक आहे. नोंदणी नूतनीकरण करताना सुधारित दराने शुल्क घ्यावे. रुग्णालयातील डॉक्टर आणि परिचारिकांची निकषाप्रमाणे संख्या आणि रुग्णालयाबाहेर लावलेले दरपत्रक या बाबींची तपासणी करावी. रुग्णालयाकडील अग्निशामक दलाच्या ना हरकत प्रमाणपत्राची तपासणी करावी. पान २ वर

## "मरणारा शेतकरी हिंदू नाही का?" - बच्चू कडू



● अमरावती, सचिन कदम :

पश्चिम विदर्भात वर्षभरात १ हजार १५१ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या असताना या प्रश्नावर सरकारची संवेदनशीलता दिसत नाही. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये हिंदू शेतकऱ्यांची संख्याच जास्त आहे. राज्यात आणि केंद्रात हिंदुत्ववादी सरकार आहे. मग तरीही हिंदू शेतकऱ्यांवर स्वत:ला संपवण्याची वेळ का येते? असा संतप्त सवाल बच्चू कडूंनी सरकारला विचारला आहे.

प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू आणि राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांच्या नेतृत्वात येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर शेतकरी आणि मेंढपाळांच्या विविध मागण्यांसाठी 'वाडा आंदोलन' सुरू करण्यात आले आहे. यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना बच्चू कडू यांनी सरकारवर टीका केली.

बच्चू कडू म्हणाले, सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांना आत्महत्या करावी लागत आहे. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये हिंदूंचीच संख्या जास्त आहे. तरीही केंद्रातील आणि राज्यातील हिंदूत्ववादी सरकारला शेतकऱ्यांचा कळवळा का नाही, हा प्रश्न आहे. आम्ही शेतकरी, शेतमजूर, मेंढपाळांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरलो आहोत. पान २ वर

## ठाणे वाशी खाडी लवकरच प्रदूषणमुक्त

● नवी मुंबई, धनश्री सट्टा :

ठाणे-बेलापूर औद्योगिक क्षेत्रातील मोठ्या संख्येने असलेल्या रासायनिक कारखान्यांचे सांडपाणी वाहून नेणारी २७ वर्ष जुनी ३.६ किलोमीटर वाहिनी नव्याने उभारण्याच्या हालचाली महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) माध्यमातून सुरू करण्यात आल्या आहेत. यासाठीचा प्रस्ताव एमआयडीसीने महाराष्ट्र किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाकडे पाठवला असून यासाठी राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेकडून महत्त्वाचे सल्लेही देण्यात आले आहेत. याबाबत महाराष्ट्र किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाची नुकतीच बैठक पार पडली. यामुळे सद्यस्थितीतील वाहिनीलगतच नवीन वाहिनी उभारण्याची शक्यता वर्तविली जात आहे. यामुळे जुन्या वाहिनीतून होणाऱ्या सांडपाण्याच्या गळतीतून ठाणे – वाशी खाडीला आणि आसपासच्या परिसराला मुक्तता मिळण्याची सकारात्मक चिन्ह दिसून येत आहेत.

आशिया खंडातील सर्वात मोठे औद्योगिक क्षेत्र म्हणून ठाणे – बेलापूर औद्योगिक क्षेत्र ओळखले जायचे. सुरुवातीच्या काळात अनेक अभियांत्रिकी कंपन्या या ठिकाणी उभ्या राहिल्या. यानंतर येथील ठाणे आणि वाशी खाडीचा भौगोलिक भाग पाहता परदेशातून आणि देशभरातून अनेक रासायनिक कंपन्यांनी या ठिकाणी आपला जम बसवला. मात्र यानंतर खाडीत सांडपाणी थेट सोडले जाऊ लागल्याने खाडीचे पाणी मोठ्या प्रमाणात प्रदूषित होऊ लागले. यानंतर येथील सर्व लघु – मोठ्या उद्योजकांनी एकत्रित येऊन येथील रासायनिक कंपन्यांच्या सांडपाण्यावर प्रक्रिया व्हावी यासाठी पुढाकार घेऊन आणि पाठपुरावा करून नवी मुंबईतील पावने येथे सामूहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारण्यात आले. पान २ वर

## मिरा रोड स्टेशन परिसरातील अनधिकृत हातगाड्या, गाळे व टपऱ्यांवर तोडक कारवाई



● मिरा भाईंदर, सुचिता सोनावणे:

दिनांक ०६ जानेवारी २०२५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक ०५ अंतर्गत मिरा रोड स्टेशन परिसरातील गाळ्यासमोरील अनधिकृत छपरे, हातगाड्या, अनधिकृत पान टपऱ्यांवर जेसीबीच्या सहाय्याने तोडक कारवाई करण्यात आली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवर मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात येत असून गेल्या काही आठवड्यापासून अशी अनधिकृत बांधकामे जमिनदोस्त केली जात आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, उपायुक्त (अतिक्रमण विभाग) कल्पिता पिंपळे यांच्या नेतृत्वाखाली विविध प्रभागातील अनधिकृत बांधकामांचा आढावा घेण्यात आला. यावेळी झालेल्या बैठकीत उपायुक्तांनी सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना त्यांच्या प्रभागातील अनधिकृत बांधकामे, फेरीवाले, गॅरेजेस, पदपथावरील व्यावसायिक, अनधिकृत होर्डिंग्ज, अनधिकृत झोपड्या यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्या पार्श्वभूमीवर दिनांक ०६ जानेवारी २०२५ मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक ०५ अंतर्गत मिरा रोड स्टेशन परिसरात गाळ्यासमोरील अनधिकृत छपरे, हातगाड्या, अनधिकृत पान टपऱ्यांवर कारवाई करण्यात आली. कारवाई दरम्यान ६२ हातगाड्या, अनधिकृतपणे बनवण्यात आलेल्या ०६ गाळ्याच्या समोरील छपऱ्यावर, एक पान टपरी व एक गाला यांच्यावर जेसीबीच्या सहाय्याने अतिक्रमण विभागामार्फत तोडक कारवाई करण्यात आली.

## गृहमंत्री अमित शहांनी केलं 'भारतपोल पोर्टल' लॉंच

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

**केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मंगळवारी सीबीआयचं भारतपोल पोर्टल लॉंच केलं. इंटरपोलच्या धर्तीवर गृह मंत्रालयानं देशात 'भारतपोल' ची सुरूवात केलीय. हे पोर्टल सीबीआयच्या अंतर्गत काम करेल. पोर्टलच्या मदतीनं, राज्य पोलीस कोणत्याही वॉन्टेड गुन्हेगार किंवा फरारी व्यक्तीच्या गुप्तचर माहितीसाठी थेट इंटरपोलची मदत घेऊ शकतील. याशिवाय विदेशी कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सीही 'भारतपोल'च्या मदतीनं भारतीय यंत्रणांशी संपर्क साधून कोणत्याही गुन्हेगाराची माहिती गोळा करू शकतील.**

देशातील गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र सरकार नवनवीन पावलं उचलत आहे. पोलीस देखील यासाठी नविन तंत्रज्ञानाचा अवलंब करत आहे. पोलीस वाढती गुन्ह्यासह तंत्रज्ञानाच्या मदतीनं गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न करत आहे. याशिवाय सीबीआयसारख्या केंद्रीय संस्था राष्ट्रीय सुरक्षासह विदेशात पळून गेलेल्या गुन्हेगारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रयत्न करत आहे. मात्र, परदेशात प ळू न गेलेल्या गुन्हेगारांना परत आणणं सुरक्षा यंत्रणांसमोर मोठं आव्हान. यासाठी भारतीय एजन्सी इंटरपोल आणि इतर परदेशी सुरक्षा संस्थांची मदत घेतेय.



केंद्र सरकार देशातून फरार झालेले गुन्हेगार आणि फरार आरोपींच्या परतीसाठी मोठं पाऊल उचलणार आहे. इंटरपोलच्या धर्तीवर गृह मंत्रालय देशात 'भारतपोल' सुरू करणार आहे. हे पोर्टल सीबीआयच्या अंतर्गत काम करेल, परंतु त्यातील सर्वात चांगली गोष्ट म्हणजे कोणत्याही वॉन्टेड गुन्हेगार किंवा फरारी व्यक्तीच्या माहितीसाठी राज्यांचे पोलीस थेट इंटरपोलची मदत घेऊ शकतात. हे पोर्टल सायबर गुन्हे, आर्थिक गुन्हे, संघटित गुन्हेगारी, मानवी तस्करी यांसारख्या आंतरराष्ट्रीय गुन्ह्यांच्या तपासाला गती देईल.

देशात गुन्हे करून परदेशात पळून गेलेल्या गुन्हेगारांवर नोटिसा बजावण्यात बराच वेळ जात असल्याचं सर्वसाधारणपणे दिसून येते. पण आता सीबीआयनं 'भारतपोल' नावानं एक हाय-टेक पोर्टल तयार केलं आहे, ज्यामध्ये केवळ NIA-ED सारख्या केंद्रीय एजन्सीच नाही, तर राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे पोलीस देखील एकत्र या तंत्रज्ञाच्या मदतीनं गुन्हेगारांवर कारवाई करु शकतील. गृहमंत्री अमित शाह मंगळवारी या पोर्टलचं उद्घाटन करणार आहेत. पान २ वर

## संपादकीय

# लाडक्या उद्योगपतीसाठी राजा उदार

सोन्याहून अधिक किंमत जेथील जमिनीला आहे अशी राज्याची राजधानी मुंबईत पुनर्विकासाच्या नावाखाली आणि धारावीच्या निमित्ताने जे काही सुरू आहे, त्यामुळे 'सैंया भए कोतवाल तो डर काहे का?' या हिंदी म्हणीची आठवण आल्याशिवाय राहात नाही. मुळात एका लाडक्या उद्योगपतीला धारावीचा प्रकल्प दिला गेला, तो प्रकारच मजेशीर होता. याआधीची निविदा रद्द केली गेली. नव्या निविदेच्या स्वीकारलेल्या बोलीपेक्षा आधीच्या निविदेतली बोली अडीच एक हजार कोटींनी जास्त होती. तरी नवी बोलीच राज्याच्या हिताची आहे, अशी बाजू सरकारनेच न्यायालयात मांडली आणि ते न्यायालयाने मान्य केले. तेवढ्यावर हा 'लाइका' समाधानी नाही. भस्म्या झाल्यासारखा तो हे, ते आणि पलीकडले खातच सुटला आहे. धारावीच्या टीडीआरचा घोळ आपण पाहिला. पुढे जे काही सुरू आहे ते पाहिले की कालचा गोंधळ बरा होता, असेच म्हणावेसे वाटते.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत, विकासक आधी भूखंडावरील झोपड्या रिकाम्या करून घेतो. त्या झोपड्यांत राहणाऱ्या कुटुंबांना मासिक भाडे दिले जाते. मग त्या मोकळ्या जागी इमारत बांधण्याचे काम सुरू केले जाते. कोणत्याही झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या एकूण खर्चात या भाड्यापोटी खर्च होणाऱ्या रकमेचा मोठा वाटा असतो. पण खास धारावीकरिता सरकारने रेल्वेची ४७.५ एकर जागा आंदण दिली. 'संबंधित कंपनीला ही जागा काही फुकट नाही दिली. त्यांनी त्याचे वट्ट १००० कोटी मोजले आहेत,' असे सांगत बाजू लावून धरली जाते, पण या एक हजार कोटींमध्ये २० एकरांवरील झोपडपट्टी असलेल्या जागेचाही समावेश आहे. नियमाप्रमाणे २० एकर झोपडपट्टीच्या जागेसाठी २०० कोटी शासनाला मिळालेच असते. म्हणजेच उरलेली २७.५ एकर मोकळी जागा ८०० कोटींना फुंकून टाकली गेली आहे. सुमारे ७५०० रुपये फूट या दराने हा व्यवहार झाला.

लक्षात घ्या, पार कर्जतजवळ गोदरेज कंपनी बंगले बांधायला जागा विकत आहे, त्याचा भाव आहे १० हजार रुपये प्रति फूट. धारावीकरिता जी जागा रेल्वेने दिली आहे ती तर भर मुंबईत माटुंग्याला आहे! आता या 'लाडक्यांचा डोळा काळा किल्ला व धारावी डेपोच्या मोकळ्या जागेवर आहे. एकूण साडेबारा एकरांचे हे मोकळे भूखंड आहेत. थोराघरच्या या मित्राला नाही म्हणायची आपल्या बेस्टची टाप नसणारच. अशीच चिरीमिरी बेस्टला देणार असतील बहुधा. बेस्ट आणि रेल्वेच्या मिळून ४० एकर जागेवर ४५० फुटांची सुमारे १३ हजार घरे उभारली जातील. म्हणजेच तेवढ्या झोपडपट्टीवासीयांचे विनाभाडे पुनर्वसन होणार आहे. आता २० हजार दरमहा या दराने सुमारे ३६ महिन्यांचे १५ हजार जणांचे भाडेच मुळी ९३६ कोटी होते. या रकमेपुढे रेल्वेला मिळालेली आठशे कोटी आणि बेस्टला त्याच दराने मिळू शकेल अशी संभाव्य रक्कम ३५० कोटी अशा एकूण ११५० कोटी रुपयांचा हिशेब बघितला तर शेठला जमिनी फुकटच मिळाल्या म्हणण्यास हरकत नाही. लक्षात घ्या एवढ्या झोपडपट्टीवासीयांचे मोकळ्या जागेवर पुनर्वसन होणार असल्यामुळे मूळ झोपडपट्टीमध्ये तेवढी जागा विक्रीसाठी इमारती बांधण्याकरिता मिळणार आहे. राजा उदार झाला आणि आवळ्याजागी भोपळा दिला. तसे आपले कनवाळू सरकार या आपल्या लाडक्या शेठला मानखुर्द, मुलुंड, कुर्ला अशा वेगवेगळ्या ठिकाणी टप्प्याटप्प्याने आजपर्यंत तब्बल ५४० एकर जागा देते झाले आहे. शेठने जागेवर बोट ठेवावे आणि सरकारने ती जागा मंजूर करावी असे चालले असावे, असे वाटते.

मुंबईतल्या या ५४० एकरांवर ४.०० एफएसआय धरून ४५० फुटांची सुमारे १ लाख ८० हजार घरे उभी राहू शकतात. आता मजा पाहा, अजून धारावीतल्या संपूर्ण झोपडपट्टीचे सर्वेक्षण व्हायचे बाकी आहे. धारावीत एकंदरीत दोन लाख झोपड्या असाव्यात असा अंदाज आहे. धारावीबाहेर ज्या जागा दिल्या आहेत त्या जागांवर धारावीतल्या सगळ्या झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन होणे सहज शक्य आहे. म्हणजे धारावीतल्या सगळ्या झोपडपट्टीवासीयांना बाहेर काढणार की काय? मग धारावीत काय फक्त विक्री घटकाच्या इमारती होणार काय? धारावीचे पुनर्वसन करण्यासाठी बाहेरील जागा द्यायची गरज जरी मान्य केली तरी त्यासाठी प्रथम सर्व झोपड्यांचे सर्वेक्षण होणे गरजेचे आहे. एकंदरीत किती जणांना घरे द्यायची आहेत ते ठरवावे लागेल. मग पुनर्वसनाचा एकात्मिक आराखडा तयार केला पाहिजे. किती जण धारावीत सामावले जातील आणि किती जणांना बाहेर पाठवावे लागेल, हे त्या आराखड्याच्या आधारे ठरवावे लागेल. मग ज्यांना बाहेर पाठवायचे त्यांना त्याची नीट कल्पना द्यायला हवी. हे सारे झाले की बाहेर किती जागा लागेल? त्यातली कोणती जागा बाहेर जाणाऱ्यांना पसंत आहे ते ठरविले पाहिजे. मग त्या जागा या प्रकल्पासाठी दिल्या पाहिजेत. इथे सारी वरातीमागून घोडे, अशीच स्थिती आहे. अद्याप सर्वेक्षण सुरूच आहे. निश्चित झोपड्यांची संख्या ठरलेली नाही आणि धारावी बाहेरच्या जागांवर घरे दिली जाणार आहेत. महाराष्ट्रात तशी हुशार, अभ्यासू राजकारण्यांची वानवा नाही. बरेच आमदार विकासक तरी आहेत, किंवा विकासकामांत त्यांच्या खुल्या छुप्या भागीदाऱ्या तरी आहेत. त्यामुळे धारावीचे जे काही सुरू आहे ते यांना समजत नाही असे म्हणणे योग्य होणार नाही. सत्ताधाऱ्यांचे सोडा, विरोधकांनीसुद्धा या मुद्द्यावर आवाज उठविल्याचे ऐकिवात नाही. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत हा प्रचाराचा मुद्दा नीट मांडलेलाच नव्हता. विरोधक शेठला नावापुरता विरोध करताना दिसले. एकेकाळच्या एनरॉनला झालेल्या विरोधाची त्यानिमित्ताने आठवण झाली. वरून कीर्तन आतून तमाशा, अशीच सारी परिस्थिती आहे. सामान्य जनतेनेच अभ्यास करून या प्रकरणाचे कंगोरे समजावून घेत आता आवाज उठवला पाहिजे. नेहमीच काही कोर्टात निकराचा लढा द्यायला बाबूराव सामंत उभे राहणार नाहीत आणि लाज वाटून राजीनामा देतील असे अंतुल्यांसारखे कमी निर्ढावलेले राजकारणी आता शिल्लक नाहीत. महाराष्ट्रातील जनतेलाच मुंबईसाठी पुढे यावे लागेल, मुंबईचे एवढे देणे आपण लागतोच.

# पतंगराव नव्हे रॉकेटराव !

महाराष्ट्रातील राजकारणात जवळपास तीस वर्ष आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमविणारे अजातशत्रू व्यक्तिमत्व असलेले काँग्रेसचे जेष्ठ नेते, महाराष्ट्राचे माजी मंत्री पतंगराव कदम यांची आज ८१ वी जयंती. ८१ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे ८ जानेवारी १९४४ रोजी पतंगराव कदम यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील सोनसळ या गावात एका गरीब कुटुंबात झाला.

त्यांचे चौथी पर्यंतचे शिक्षण गावातल्या शाळेत झाले तर सातवी पर्यंतचे शिक्षण शिरसगाव या गावात झाले. ११ वी पर्यंतचे शिक्षण म्हणजे त्या काळातील मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण त्यांनी कमवा व शिका योजनेअंतर्गत पूर्ण केले. एफ. वाय बी. ए नंतर त्यांनी टीचर्स डिप्लोमा पूर्ण केला व शिक्षक होण्याचे स्वप्न उराशी बांधून पुणे गाठले. पुण्यातील हडपसर येथे दहा बाय दहाच्या पत्र्याच्या खोलीत राहून त्यांनी गोरगरिबांच्या मुलांना शिकवण्याचे काम सुरू केले. शिक्षक असतानाच गोरगरिबांच्या मुलांना उच्च शिक्षण मिळावे यासाठी काही तरी करावे असा विचार त्यांच्या मनात येऊ लागला त्यातूनच , भारती विद्यापीठाची मुहूर्तमेढ रोवली गेली. बा. ग पवार, वसंतराव म्हेत्रे, महादर सर, नीलाखे सर अशा पाच लोकांना घेऊन त्यांनी १० मे १९६४ रोजी भारती विद्यापीठाची स्थापना केली. त्यावेळी त्यांच्या खिशात अवघे ३८ रुपये होते.



हळूहळू भारती विदयापीठाचा विस्तार वाढू लागला. शहराप्रमाणे ग्रामीण भागातही भारती विद्यापीठाच्या पाट्या झळकू लागल्या. भारती विद्यापीठामुळे गोरगरिबांच्या मुलांना इंग्रजीतून शिक्षण मिळू लागले. सर्वसामान्य कुटुंबातील मुले उच्च शिक्षण घेऊ लागली. त्यांनी लावलेल्या भारती विद्यापीठाच्या रोपट्याचे आज वटवृक्ष बनले आहे. के.जी ते पी.जे असे सर्वप्रकारचे शिक्षण आज भारती विद्यापीठातून मिळत आहे. शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य महान असेच आहे.

भारती विद्यापीठाचा पसारा सांभाळीत त्यांनी राजकारणातही ठसा उमटविला. १९६८ साली एस टी महामंडळाच्या सदस्यपदी त्यांची निवड झाली. गाव तिथे एस टी ही योजना राबवून त्यांनी गावागावात एस टी पोहचवली. १९८५ साली त्यांनी अपक्ष म्हणून विधानसभेची निवडणूक लढवली. त्यात ते विजयी झाले. १९९० सालच्या विधानसभा निवडणुकीत त्यांना काँग्रेसने त्यांना तिकीट दिले तेंव्हापासून १९९५ सालचा अपवाद वगळता ते सतत निवडून आले. २०१४ साली मोदी लाटेत अनेक दिग्गज नेत्यांचा पराभव झाला पण त्यांनी आपला गड राखला. या दरम्यान त्यांनी शिक्षण, सहकार, उद्योग, महसूल, वन या महत्वाच्या खात्याची मंत्रीपदे सांभाळली. इतकी वर्ष मंत्रीपदावर राहूनही त्यांच्यावर एकही आरोप झाला नाही यातच त्यांचा कारभार किती पारदर्शक होता, हे दिसून येते.

काँग्रेस पक्षावर त्यांची नितांत श्रद्धा होती. सत्ता असो वा नसो काँग्रेस पक्षाशी ते कायम एकनिष्ठ राहिले. प्रत्येकवेळी मुख्यमंत्र्यांच्या स्पर्धेत त्यांचे नाव कायम चर्चेत असायचे, पण दुर्दैवाने ते मुख्यमंत्री बनू शकले नाही. तरीही त्यांनी याबाबत कधीही जाहीर नाराजी व्यक्त केली नाही. पक्ष सोडण्याचा विचारही त्यांच्या मनात कधी आला नाही. आजच्या आयाराम गयाराम संस्कृतीत पतंगरावांची निष्ठा उठून दिसते. पतंगराव तरुण पिढीसाठी मार्गदर्शक आहेत.

बेधडक आणि मनमोकळा स्वभाव हे त्यांचे वैशिष्ट्य होते. ओठात एक आणि पोटात एक असे पतंगरावांच्या बाबतीत कधीच झाले नाही. खऱ्याला खरे आणि खोट्याला खोटे म्हणण्याची त्यांची वृत्ती राजकारणात अभावानेच पाहायला मिळते. त्यांचे भाषण म्हणजे पर्वणीच. त्यांच्या भाषणात गावाकडचा रांगडेपणा असायचा. कार्यकर्त्यांचा गराडा कायम त्यांच्यासोबत असायचा. उद्घाटनाच्या कार्यक्रमाला पतंगरावांनाच बोलवायचे असा कार्यकर्त्यांचा आग्रह असायचा.

त्यांच्या कामाचा धडाका देखील जबरदस्त असायचा. आपल्या मतदारसंघात त्यांनी कामाचा डोंगर उभा केला होता. आपल्या मतदारसंघात एमआयडीसी उभारून त्यांनी अनेक उद्योगधंदे आणले. सूत गिरण्या, साखर कारखाने, वाईन पार्क, भारती विद्यापीठ, भारती हॉस्पिटल उभारून मोठ्या प्रमाणात उद्योग निर्मिती केली. त्यांच्या कामाचा झपाटा इतका असायचा की, एकदा पु. ल. देशपांडे म्हणाले की, हे पतंगराव नव्हेत तर रॉकेटराव आहेत. पतंगराव कदम यांनी सहकार क्षेत्रातही आपला ठसा उमटविला. ९ मार्च २०१८ रोजी पतंगराव कदम यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील एक असामान्य व्यक्तिमत्व काळाच्या पडदयाआड गेले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राची मोठी हानी झाली. पतंगराव कदम यांना ८० व्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, पुणे**

# गंगा दशहरा शतकोत्तर अमृत महोत्सवी वर्षाची सांगता

## भिवंडीतील गंगा दशहरा उत्सव मोठी सांस्कृतिक जडणघडण आहे.... कीर्तन शिरोमणी मनोहर दीक्षित

**भिवंडी (विवेक गुंजाळ)** - भिवंडी सारख्या शहरात गेली १७५ वर्षे गंगा दशहरा उत्सव साजरा करण्यात येत आहे. हा उत्सव म्हणजे ख-या अर्थाने धर्म, व संस्कृति यांना जोडणार दुवा आहे. या उत्सावचे माध्यम हे कीर्तन आहे. व कीर्तन हा एक भक्तीचा उत्सव आहे. या गंगा दशहरा किर्तन महोत्सवातून चांगलेच नवनित निर्माण झाले आहे. गंगा ही सर्व भारतीयांचे श्रध्दास्थान आहे. गंगा हे केवळ नाव जरी घेतले तरी मनुष्य विष्णू लोकात जातो, अशी समज आहे. गेली वर्षभर भिवंडीकरांनी हा उत्सव विविध उपक्रमांनी साजरा केला. यातून वर्षभर आपण गंगेच्या ज्ञानरूपी प्रवाहात आध्यात्मिक सुविचारांना गतिशील, क्रीयाशील बनविण्याची




संधी प्राप्त झाली हा उत्सव म्हणजे भिवंडी शहराकरीता मोठी सांस्कृतिक जडणघडण आहे. असे उद्गार ह.भ.प. कीर्तन शिरोमणी मनोहर बाळकृष्ण दीक्षित यांना काढले. भिवंडीच्या भिमेश्वर मंदिराच्या १७५ वर्षाच्या गंगा दशहरा उत्सवानिमित्त काढण्यात आलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन करताना भिमेश्वर मंदिर सभागहात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपिठावर भिमेश्वर देवस्थानचे सरपंच अशोक कुलकर्णी, माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील उपस्थित होते.

दीक्षित महाराज पुढे म्हणाले की, आपल्या लौकिक जीवनात त्याकाळी भिवंडीतून भ्रमण करीत गंगेपर्यत जाणे अशक्य आहे म्हणून गंगेचे नामोच्चरण करून गंगेलाच भिवंडीत आणले. वराळदेवी तलावातून गंगा भिमेश्वरा पर्यंत आणली त्यावेळेपासून सुरू झालेला हा गंगा दशहरा उत्सव म्हणजेच शहरात गंगेचे आगमन झाल्याचा सोहळा जो कीर्तन परंपर या माध्यमातून साजरा केला जातो. या कीर्तन परंपरेतून धर्म, संस्कृती रक्षणाचे व जोपासण्याचे कार्य केले जाते. गंगा ही भारतीय संस्कृतीची औळख आहे. ती ज्ञानगंगा आहे. गंगेचा उत्सव म्हणजेच गंगा दशहरा म्हणजे ज्ञानाची अभिरूची निर्माण करून अज्ञानाचा अंधकार दूर करणे हीच परंपरा आहे. व संस्कृतीचा अनमोल ठेवा भिवंडी करांनी जतन करून ठेवला आहे व तो पुढे वृध्दींगत व्हावा यातून समाजाचे अभिभिसरण व्हावे हीच अपेक्षा आहे. या प्रसंगी माजी केंद्रीय पंचायत राज मंत्री कपिल पाटील यांनी देखील गंगा दशहरा महोत्सवाचे महत्व विषद केले. शतकोत्तर अमृत महोत्सवी वर्ष गंगा दशहरा उत्सव स्मरणिका संपादक यशवंत कुंटे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर कार्यक्रमाचे सुत्र संचालन राधा जोशी तर आभार प्रदर्शन वैशाली गोडसे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करणेकरीता मयुरेश घुले, अमित जोशी, राजेश कुंटे,मिलिंद पळसुले,अतुल पेठे, विश्वास जोगळेकर, प्रशांत जोशी, शेखर कोपरकर, नयना कोपरकर, अंकिता गद्रे, निकीता गांगल सुवर्णा कुटुंबळे इत्यादी यांनी विशेष परीश्रम घेतले. या कार्यक्रमास समाजातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

## पान १ वरून...

### १ एप्रिलपासून फास्ट टॅग सर्व वाहनांकरिता ...

याचाच अर्थ एक फास्ट टॅग दुसऱ्या वाहनासाठी वापरता येणार नाही. याची पडताळणी करण्यासाठी केवीआयसी नियम लागू करण्याचा निर्णय प्राधिकरणानं घेतला आहे. ३१ जानेवारीनंतर केवायसी नसलेले जुने फास्ट टॅग बंद होणार आहेत. त्यानंतर वाहनचालकांना टोल प्लाझावर दुप्पट टोल भरावा लागणार आहे.

### आरोग्य विभागाचे खासगी रुग्णालयांवर...

रुग्णालयाच्या जैववैद्यकीय कचऱ्याच्या विल्हेवाटीबद्दल माहिती घ्यावी. रुग्णालयातील रुग्णांशी संवाद साधून त्यांचा अभिप्राय घ्यावा, असे नियमावलीत म्हटले आहे.

वैद्यकीय अधिकाऱ्यांनी १५ दिवसांत त्यांच्या कार्यक्षेत्रातील रुग्णालयांची तपासणी करावी. ही तपासणी पूर्ण झाल्यानंतर त्याचा अहवाल संबंधित जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक आणि महापालिकेच्या आरोग्य प्रमुखांना सादर करावा. यानंतर या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्रुटी आढळलेल्या रुग्णालयांना नोटीस बजावून एक महिन्यात सुधारणा करण्यास सांगावे. त्यानंतर १५ दिवसांत पुन्हा पाहणी करून तपासणी करावी, असेही नियमावतील नमूद केले आहे. खासगी रुग्णालयांकडून नियमांचे पालन केले जाते. त्यामुळे आरोग्य विभागाने नेमकी कशाची तपासणी करणार हे आधी स्पष्ट करावे. याचबरोबर तपासणीची पूर्वसूचना रुग्णालयांना द्यायला हवी. याचबरोबर अनेक वेळा तपासणीच्या नावाखाली रुग्णालयांना त्रास देण्याचे प्रकार घडतात. असे प्रकार टाळण्याचा प्रयत्न आरोग्य विभागाने करावा. – डॉ. संजय पाटील, राष्ट्रीय सचिव, हॉस्पिटल बोर्ड ऑफ इंडिया

### "मरणारा शेतकरी हिंदू नाही का?" - बच्चू कडू

आंदोलनाची ही आमची पहिलीच वेळ नाही. आमचा जन्मच आंदोलनासाठी झाला आहे. पदावर असो किंवा नसो, आम्ही आमची सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्षाची भूमिका सोडणार नाही. सरकारने आमच्या मागण्यांची दखल घ्यावी, पोलिसांनी आंदोलकांची अडवणूक करू नये, अशी आमची अपेक्षा असल्याचे बच्चू कडू म्हणाले.

राज्यातील मेंढपाळ आपल्या न्याय मागणीकरिता सरकारचे उंबरठे झिजवित असताना त्यांच्या मागण्यांच्या संबधात मुख्यमंत्री कुठलेही ठोस पाऊल उचलत नाहीत. शेतकरी व मेंढपाळांसाठी हे आंदोलन करण्यात येत आहे. सोयाबीन, तूर, कापसाचे भाव कोसळले आहेत. दुसरीकडे बियाणे, रासायनिक खते, शेणखताचे भाव वाढत जात आहे. अशी परिस्थिती असताना शेतकऱ्यांनी आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह कसा चालवायचा? असा सवालही कडू यांनी यावेळी सरकारला विचारला आहे.

येथील संत गाडगेबाबा मैदानावरून मोर्चाला सुरूवात झाली. मेंढपाळाच्या वेशात घोड्यांवर स्वार होऊन बच्चू कडू आणि महादेव जानकर हे विभागीय आयुक्त कार्यालयावर पोहचले. मोर्चादरम्यान कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मोर्चात शेळ्या, मेंढ्या आणि घोड्यांसह शेकडो आंदोलक सहभागी झाले होते.राज्य सरकारने विधानसभा निवडणूकीच्या काळात घोषीत केलेली सरसकट कर्जमाफी शेतकऱ्यांना तातडीने मिळावी, चराईकरिता परराज्यातून येणाऱ्या मेंढपाळांवर बंदी घालण्यात यावी अश्या अनेक मागण्या यावेळी 'वाडा आंदोलना'तून करण्यात आल्या आहेत.

### ठाणे वाशी खाडी लवकरच प्रदूषणमुक्त

यानंतर येथून रासायनिक कंपन्यांच्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून ठाणे खाडीत सोडण्यात येऊ लागले. याच केंद्रातून सांडपाणी वाहून नेणारी वाहिनी जुनी झाली असून नव्याने टाकण्यासाठी एमआयडीसीने हालचाली सुरू केल्या आहेत.

**पॉइंटर्स**

नवी मुंबईतील पावने येथे १९९७ मध्ये सामूहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारण्यात आले. यावेळी त्याची क्षमता १२ दलल (दशलक्ष लिटर) इतकी होती.

येथील रासायनिक कंपन्यांची संख्या वाढू लागली आणि औद्योगिक क्षेत्राचा विस्तार होऊ लागल्याने २००६ साली या केंद्राची क्षमता अतिरिक्त १५ दलल इतकी करण्यात आली.

सद्दस्थितीत या केंद्राची क्षमता २७ दलल इतकी आहे. येथून सांडपाणी वाहून नेणारी वाहिनी तब्बल २७ वर्ष जुनी असल्याने ती पूर्णपणे बदलण्याची गरज आहे. तसेच काही ठिकाणी ही वाहिनी तुटलेली असल्याने येथून होत असलेली सांडपाण्याची गळती धोकादायक देखील झाली आहे.

**खारफुटीची अन्यत्र लागवड बंधनकारक**

प्रक्रिया केलेले रासायनिक सांडपाणी सद्यस्थितीत ठाणे खाडीत सोडण्यात येते. यासाठी प्रक्रिया केंद्रातून ३.६ किलोमीटरची वाहिनी हे सांडपाणी वाहून आणते. मात्र तब्बल २७ वर्ष जुनी असलेल्या या वाहिनीची अनेकदा दुरुस्ती करण्यात आली आहे. मात्र आता या वाहिनीची दुरुस्ती करण्याऐवजी ९०० मिमी व्यास असलेली नवीन वाहिनी टाकणे गरजेचे असल्याचे राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेकडून सुचविण्यात आले आहे. सद्यस्थितीतील वाहिनी लगतच नवीन वाहिनी उभारण्याचे एमआयडीसीचे नियोजन आहे. तसेच या वाहिनीचा काही भाग हा खारफुटीमध्ये देखील येतो. त्यामुळे नवीन वाहिनीचे काम करताना थोड्या प्रमाणात नष्ट होणारी खारफुटीची दुसरीकडे सक्तीने लागवड करणे बंधनकारक असल्याचे ही राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेकडून सांगण्यात आले आहे.

ठाणे बेलापूर औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक सांडपाणी वाहून नेण्यासाठी नव्या वाहिनीचे नियोजन आहे. रासायनिक सांडपाण्यामुळे कोणतेही प्रदूषण होऊ नये यासाठी एमआयडीसी कायम सतर्क असते. तसेच सद्यस्थितीत असलेली ३.६ किमीच्या वाहिनीची देखभाल योग्य पद्धतीने सुरु आहे.

संजीव सावळे, उप अभियंता, एमआयडीसी, महापे

### गृहमंत्री अमित शहांनी केलं 'भारतपोल...

त्याची यशस्वी चाचणी यापूर्वीच झाली आहे.या पोर्टलची विशेष बाब म्हणजे आता राज्यांचे पोलीस कोणत्याही गुन्हेगाराची माहिती गोळा करण्यासाठी थेट इंटरपोलला विनंती करू शकतात. इंटरपोलनं विनंती स्वीकारल्यास थेट राज्यांच्या पोलिसांना माहिती देता येईल. इंटरपोलसोबत भारतीय सुरक्षा यंत्रणांचा समन्वय सुलभ आणि गतिमान बनवणं हा या पोर्टलचा उद्देश आहे.

सध्या, एखाद्या फरारी गुन्हेगाराला नोटीस बजावण्यासाठीही, राज्यांना प्रथम सीबीआयला विनंती करावी लागते. नंतर ती विनंती इंटरपोलकडं पाठवली जाते. त्यानंतर इंटरपोलकडून सीबीआयला माहिती पाठवली जाते. सीबीआय नंतर ती माहिती राज्य पोलिसांना देते. ही एक किचकट प्रक्रिया अकल्यानं त्यात वेळेचा अपयव्य होत होता. त्यामुळं हा प्रश्न सुलभ करण्यासाठी हे पोर्टल तयार करण्यात आलं आहे. 'भारतपोल' कार्यान्वित झाल्यानंतरही नोटीस बजावण्याचं अधिकार इंटरपोलकडेच राहतील. इंटरपोलनं पोर्टलद्वारे कोणत्याही राज्य पोलिसांची विनंती स्वीकारली, तर ते त्या गुन्हेगाराविरुद्ध रेड कॉर्नर किंवा इतर प्रकारच्या नोटिसा जारी करू शकता. तसंच, त्याचं स्थान आणि इतर माहिती थेट राज्यांशी शेअर केली जाऊ शकते.

इंटरपोलला सोप्या भाषेत इंटरनॅशनल पोलीस म्हणता येईल. त्यालाच 'इंटरनॅशनल क्रिमिनल पोलीस ऑर्गनायझेशन' असं देखील म्हणातात. ही संस्था सदस्य देशांच्या सुरक्षा एजन्सींमधील गुन्हेगारी प्रकरणांमध्ये मदत आणि समन्वय सुलभ करते. आंतरराष्ट्रीय गुन्ह्यांना आळा घालणे आणि तपासात मदत करणे हा या इंटरपोल उद्देश आहे. इंटरपोलची स्थापना १९२३ मध्ये झाली होती. त्याचं मुख्यालय फ्रान्समधील लियोन शहरात आहे. इंटरपोलचे सध्या १९६ सदस्य देश आहेत, ज्यामुळं ती संयुक्त राष्ट्रांनंतर जगातील दुसरी सर्वात मोठी संस्था आहे. भारत १९४६ पासून इंटरपोलचा सदस्य आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www. lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@ gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# रस्ते विकासाशी निगडित सर्व विषय तातडीने मार्गी लावणार ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिली ग्वाही

## एमएमआरडीएचे अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुदगल यांच्या उपस्थितीत एमएमआरडीएच्या सर्व प्रकल्पांचा घेतला आढावा

**ठाणे (रोहित जैसवाल) :** ठाणे महापालिका क्षेत्र आणि परिसरातील वाहतुकीच्या स्थितीमध्ये आमुलाग्र बदल घडवून आणण्यासाठी एमएमआरडीए मार्फत रस्ते विकासाची विविध कामे सुरू आहेत. या कामांसाठी आवश्यक असलेल्या भूसंपादनातील अडचणी, पर्यावरण मान्यता, वृक्षांशी निगडित विषय आदी गोष्टींबाबत ठाणे महानगरपालिका पूर्णपणे सकारात्मक आहे. हे विषय तातडीने मार्गी लावण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी स्पष्ट केले आहे. एमएमआरडीएमार्फत ठाणे महापालिका क्षेत्र आणि परिसरात सुरू असलेल्या वाहतूक सुधारणा प्रकल्पांबाबत आढावा घेण्यासाठी महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी बैठक झाली. या बैठकीस, एमएमआरडीएचे अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुदगल, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, सहायक संचालक नगररचना संग्राम कानडे, पोलीस उपायुक्त (वाहतूक) पंकज शिरसाट यांच्यासह महापालिका, एमएमआरडीए, महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग आदींचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. घोडबंदर रस्ता आणि सेवा रस्ता यांचे एकत्रीकरण, आनंद नगर ते साकेत उन्नत रस्ता, बाळकुम ते गायमुख किनारी रस्ता, गायमुख ते पायेगाव




खाडी पूल, कासारवडवली ते खारबाव खाडी पूल, कोलशेत ते काल्हेर खाडी पूल, ठाणे-बोरिवली भुयारी मार्ग या वाहतूक सुधारणा प्रकल्पांचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. ठाणे महानगरपालिकेशी निगडित भूसंपादन, पर्यावरण परवानगी, वृक्षारोपण, जल-मल वाहिन्यांचे स्थलांतरण यावर या बैठकीत चर्चा झाली.

### ऐरोली ते कटाई नाका

ऐरोली ते कटाई नाका या उन्नत रस्त्यासाठी आवश्यक असलेल्या वाढीव जागेसाठी भूसंपादन करण्याचा सुधारित प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे, तसेच या वाढीव भूसंपादनाच्या खर्चासाठी निधीची मागणी करण्यासाठी सुधारित प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात येणार आहे.

ऐरोली ते कटाई या रस्त्यासाठी १२.५९ हेक्टर जागेचे संपादन ठाणे महापालिकेद्वारे करण्यात येत आहे. त्यासाठी मूळ प्रस्ताव २५३ कोटी रुपयांचा होता. त्यात वाढ होऊन आणखी जागा किती लागेल, तसेच त्याचा खर्च किती येईल यासाठी सर्वेक्षण केले जाणार आहे. त्यानंतर, भूसंपादन आणि वाढीव खर्च या दोन्हींचे सुधारित प्रस्ताव पाठविण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

### घोडबंदर रस्ता एकत्रीकरण

घोडबंदर रोड आणि सेवा रस्ता एकत्रिकरण करण्याच्या प्रकल्पात महावितरणच्या वीज वाहिन्यांचे स्थलांतरण हे मोठे आव्हानात्मक काम असेल. या वाहिन्यांच्या स्थलांतरणासाठी महावितरण, एमएमआरडीए आणि ठाणे महानगरपालिका यांनी पुढील आठ दिवसात एकत्रित सर्वेक्षण करावे. तसेच या स्थलांतरणाचा आराखडा तयार करावा, असे निर्देश या बैठकीत देण्यात आले.

# महापालिका लोकशाही दिन ०३ फेब्रुवारी रोजी, २० जानेवारीपूर्वी निवेदन सादर करण्याचे नागरिकांना आवाहन

**ठाणे (विशाल पाटील) :** ठाणे महापालिकेचा पुढील लोकशाही दिन ०३ फेब्रुवारी २०२५ रोजी होणार आहे. तरी नागरिकांनी फेब्रुवारी महिन्याच्या लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी म्हणजेच दिनांक २० जानेवारीपूर्वी त्यांचे अर्ज- निवेदने महापालिका भवन, नागरी सुविधा केंद्र येथे दोन प्रतीत सादर करावे. हे निवेदन दाखल करताना अर्जदाराने प्रत्येक निवेदना सोबत प्रपत्र-१ (ब) सादर करणे आवश्यक आहे. प्रपत्र-१ (ब) नागरी सुविधा केंद्र येथे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र.प्रसुधा-१०९९/ सीआर-२३/९८/१८-अ, दिनांक २६ सप्टेंबर २०१२ नुसार माहे डिसेंबर- २०१२ पासून लोकशाही दिनाच्या दिवशी नागरिकांची निवेदने न स्विकारता, हे निवेदन दोन प्रतीत लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी महापालिका कार्यालयात सादर करणे आवश्यक असल्याचे आदेश काढण्यात आले आहेत.

मुख्यालयातील या लोकशाही दिनामध्ये, परिमंडळ लोकशाही दिनामध्ये ज्या नागरिकांनी आपली निवेदने सादर केलेली आहेत, तसेच ज्या निवेदनावर १ महिन्यापर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नाही, अशाच निवेदनांचा स्वीकार करण्यात येईल. नागरिकांनी महापालिका मुख्यालयातील लोकशाही दिनामध्ये निवेदन सादर करताना परिमंडळ लोकशाही दिनामध्ये मिळालेला टोकन क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे. अर्जदाराने एका अर्जात एकच तक्रार सादर करावी, एकापेक्षा जास्त तक्रारी असलेला अर्ज स्वीकारला जाणार नाही. त्याचप्रमाणे आस्थापना विषयक, विविध न्यायालयात, लोकआयुक्त यांचेकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणाच्या तक्रारी, माहिती अधिकार कक्षेत येणारी प्रकरणे, तसेच राजकीय पक्षाच्या, नगरसेवकांच्या संस्थेच्या लेटरहेडवरील अर्ज, अंतिम उत्तर दिलेले आहे किंवा देण्यात येणार आहे, अशा प्रकरणी केलेला अर्ज, तक्रार वैयक्तिक स्वरुपाची नसेल तर असे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

# सरकारने रद्द केलेल्या अकृषिक कराच्या ठाणेकरांना नोटीसा

**ठाणे (सम्यक कासारे) :** महायुती सरकारने काही महिन्यांपूर्वी अकृषिक कर पूर्णतः माफ करण्याचा निर्णय घेतलेला असतानाही विधानसभा निवडणुकीनंतर शहरातील इमारती आणि गृहसंकुलांना जिल्हा प्रशासनाकडून अकृषिक कर भरण्यासंबंधीच्या नोटीसा पाठविण्यात आल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त होऊ लागला आहे. दरम्यान, सात दिवसांच्या आत कराचा भारणा केला नाहीतर दंडात्मक कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. महाराष्ट्रात १ लाख २५ हजार गृहनिर्माण संस्था आहेत. तर, ठाणे जिल्ह्यात ३३ हजार आणि शहरात साडेचार हजार सोसायट्या आहेत. या सोसाट्यांना अकृषिक कराचा भारणा करण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून नोटिसा बजावण्यात येत होत्या. नोटीसांमुळे रहिवासी हतबल झाले होते. या पार्श्वभूमीवर हा कर स्थगित करावा यासाठी ठाणे जिल्हा हाउसिंग फेडरेशन, महाराष्ट्र हाऊसिंग फेडरेशन, पुणे हाऊसिंग फेडरेशनच्या महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण महासंघाने न्यायालयात जनहित याचिकाही दाखल केली होती. तसेच ठाणे शहराचे आमदार




संजय केळकर यांनी २०१८ ते २०२३ पर्यंत संबंधीत तीन मंत्र्यांकडे वारंवार बैठका घेऊन हा मुद्दा लावून धरला होता. तत्कालीन महसुल मंत्री राधाकृष्ण विखे – पाटील यांनी अकृषिक कर रद्द करण्यासाठी समिती नेमुन कर वसुलीला स्थगिती दिली होती. यानंतर महायुती सरकारने अकृषिक कर पूर्णतः माफ करण्याचा निर्णय घेतला होता. यासंबंधीचा प्रचार भाजपने विधानसभा निवडणुकीत केला होता. परंतु निवडणुक संपताच शहरातील इमारती आणि गृहसंकुलांना जिल्हा प्रशासनाने अकृषिक कर भरण्यासंबंधीच्या नोटीसा पाठविल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त होऊ लागला आहे. या संदर्भात ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्याशी संपर्क साधूनही त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही. ठाणे शहराच्या मध्यवर्ती भागातील जुन्या ठाण्यात म्हणजेच नौपाडा, उथळसर, पाचपाखाडी या भागातील इमारतींना जिल्हा प्रशासनाने अकृषिक कर भरण्याच्या नोटीसा पाठविल्या आहेत. मागील वर्षाची थकबाकी आणि चालू वर्षाची मागणी अशा एकूण रक्केच्या या नोटीसा पाठविण्यात आल्या आहेत. यामध्ये काही इमारतींना ५० ते ७० हजार रुपयांची देयके पाठविण्यात आलेली आहेत.

■ अकृषिक कर रद्द वसुलीला यापूर्वीच स्थगिती देण्यात आलेली असून महायुती सरकारने हा कर पुर्णत: माफ केला आहे. त्यामुळे या नोटीसा बेकायदेशीर असून याबाबत जिल्हाधिकाऱ्यांसोबत चर्चा केली आहे. कुणीही हा कर भरू नये.

**– संजय केळकर, आमदार, ठाणे शहर**

■ महायुती सरकारने हा कर पुर्णत: माफ करण्याचा निर्णय घेतला असला तरी त्याचा अध्यादेश निघालेला नाही. हा अध्यादेश लवकरच निघेल. तसेच अध्यादेश निघाला नसला तरी या कराची वसुली करण्यास यापूर्वीच सरकारने स्थगिती दिली आहे. तरीही अधिकारी जबदस्तीने अशा नोटीसा पाठवून नागरिकांना त्रास देत आहेत.

**– सिताराम राणे, अध्यक्ष, ठाणे जिल्हा हाउसिंग फेडरेशन**

महायुती सरकारने अकृषिक कर पूर्णतः माफ करण्याचा निर्णय घेतलेला असतानाही अशा नोटीसा पाठविण्यात आल्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

# ‘एचएमपीव्ही’ या विषाणूबाबत नागरिकांनी घाबरून जाऊ नये!

**■ ठाणे महापालिकेचे आवाहन**
**■ छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथे विशेष वॉर्ड तयार**

**ठाणे (विशाल कारंडे) :** सध्या चीनमध्ये एचएमपीव्ही साथीचा उद्रेक झाल्याच्या बातम्या येत आहेत. भारततही काही रुग्ण आढळले आहेत. मात्र, त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये. हा एक सामान्य श्वसन विषाणू आहे. तो श्वसनमार्गाच्या वरील भागातील संसर्गास (सर्दीसारख्या) कारणीभूत ठरतो. हा एक हंगामी रोग असून तो सामान्यतः फ्लूप्रमाणेच हिवाळा आणि उन्हाळयाच्या सुरुवातीला उद्भवतो. ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी महापालिकेच्या आरोग्य विभागाला सर्तक राहण्याचे निर्देश दिले आहेत. या विषाणूबाबत, राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने राज्यातील श्वसनाच्या संसर्गाच्या आकडेवारीचे विश्लेषण केले आहे. त्यानुसार, २०२३च्या तुलनेत




### विशेष वॉर्ड तयार

■ दरम्यान, खबरदारीचा उपाय म्हणून ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा येथे १५ खाटांचा आयसोलेशन वॉर्ड तयार करण्यात आला आहे.

डिसेंबर-२०२४ मध्ये या आराजाच्या रुग्णात कोणतीही वाढ झालेली नाही. तरीही, खबरदारीचा एक भाग म्हणून नागरिकांना श्वसनाच्या संसर्गापासून बचाव करण्यासाठी काय करावे आणि काय करु नये या संदर्भातील सूचनांचे पालन करण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

### हे करु नये

■ हस्तांदोलन करणे
■ टिश्यू पेपर आणि रुमालाचा पुनर्वापर
■ आजारी लोकांशी जवळचा संपर्क
■ डोळे, नाक आणि तोंडाला वारंवार स्पर्श करणे.
■ सार्वजनिक ठिकाणी थुंकणे
■ डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषध घेणे.
■ नागरिकांनी या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन ठाणे महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

### हे करावे...

■ खोकला किंवा शिंका येत असतील तेव्हा आपले तोंड आणि नाक रुमाल किंवा टिश्यू पेपरने झाका.
■ साबण आणि पाणी किंवा अल्कोहोल आधारित सॅनिटायझरने हात वारंवार धुवा.
■ ताप, खोकला आणि शिंका येत असल्यास सार्वजनिक ठिकाणांपासून दूर राहा.
■ भरपूर पाणी प्या आणि पौष्टिक अन्न खा.
■ संक्रमण कमी करण्यासाठी सर्व ठिकाणी पुरेसे वायूविजन (व्हेंटीलेशन) राहील, याची दक्षता घ्या.
■ काहीही शंका असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# कोळसेवाडी पोलिसांची विद्यार्थ्यांमध्ये सायबर जनजागृती



**कल्याण (गणेश बागडे) :** पोलीस रेझिंग डे निमित्ताने कोळसेवाडी पोलीस स्टेशन हद्दिमध्ये मॉडेल इंग्लिश स्कूल, कोळसेवाडी मार्केट कल्याण पूर्व येथे सायबर जनजागृती तसेच महिला सुरक्षा याबाबत विद्यार्थ्यांशी संवाद साधून जनजागृती करण्यात आली. यावेळी सायबर जनजागृती विषयक मार्गदर्शन केले. गुड टच, ब्याड टच तसेच सोशल मीडियाचा वापर आणि विना परवाना ड्रायव्हिंग याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी सुमारे ७० ते ७५ विद्यार्थी व ४ शिक्षक उपस्थित असल्याची माहिती कोळशेवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कदम यांनी दिली.

# मिठाईत गुंगीचं औषध देऊन अल्पवयीन तरुणीवर बलात्कार

## नराधमाला उत्तर प्रदेशात ठोकल्या बेड्या

**कल्याण (विवेक गुंजाळ) -** भंगार गोळा करणाऱ्या नराधमानं अल्पवयीन तरुणीवर बलात्कार केल्यानं मोठी खळबळ उडाली. या प्रकरणी पोलिसांनी उत्तर प्रदेशातील सिद्धार्थनगर जिल्ह्यातून या नराधमाला बेड्या ठोकल्या आहेत. मिठाईत गुंगीचं औषध देऊन अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्या नराधमाला उत्तर प्रदेश राज्यातील सिद्धार्थ नगर जिल्ह्यात पोलिसांनी बेड्या ठोकल्या. हा नराधम डोंबिवली पूर्वेतील मानपाडा पोलीस ठाण्याच्या परिसरात एका अल्पवयीन मुलीवर तिच्या घरात बलात्कार करून फरार झाला होता. बऱ्याच महिन्यांपासून तो पोलिसांना गुंगारा देत होता.

नराधम आणि पीडिता दोघंही उत्तर प्रदेशातील : पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित अल्पवयीन मुलगी आणि नराधम उत्तर प्रदेश राज्यातील रहिवासी असल्यानं दोघंही एकमेकांच्या ओळखीचे आहेत. विशेष म्हणजे पीडित मुलगी डोंबिवली पूर्वेतील एका वस्तीत कुटुंबासह राहून भंगार गोळा करण्याचं काम करत होती. तर नराधम हाही भंगार गोळा करण्याचा व्यवसाय करुन तो पीडित अल्पवयीन मुलीच्या घरीच राहात होता. त्यातच जानेवारी २०२२ मध्ये नराधमाची वाईट नजर त्या पीडित मुलीवर पडली. तेव्हापासून तो तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न



करत होता. मात्र पीडित मुलगी त्याला विरोध करत होती. त्यानंतर मात्र ऑक्टोबर २०२४ मध्ये नराधमानं पीडित मुलीला मिठाईमधून गुंगीचं औषध देऊन तिला बेशुद्ध केलं. त्यानंतर त्यानं तिच्यावर राहत्या घरातच बलात्कार केला.

पीडितेच्या भावाला ठार मारण्याची धमकी देत अत्याचार : बलात्काराच्या घटनेनंतर पीडित मुलगी भयभीत झाली. या घटनेचा फायदा घेऊन नराधमानं नोव्हेंबर २०२४ रोजी पीडितेला आणि तिच्या भावाला ठार मारण्याची धमकी देऊन पीडित मुलीवर बलात्कार केला. त्याच्याकडून होणाऱ्या वारंवार बलात्कारांच्या घटनामुळं पीडित अल्पवीयन मुलीला त्रास असहाय्य झाला. अखेर तिनं १४ डिसेंबर रोजी मानपाडा पोलीस ठाण्यात धाव घेऊन नराधमाविरोधात तक्रार दाखल केली. पीडितेच्या तक्रारीवरुन पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ६४(१), ६४(२) (आय ), ६४ (२) (एम ), १२३, ७९, ३५१(२), सह पोक्सोचे कलम ४, ६, ८, १२ नुसार गुन्हा दाखल केला. गुन्हा दाखल होताच नराधमानं ठोकली धूम : गुन्हा दाखल झाल्याची कुणकुण नराधमाला लागताच तो मुळगाव असलेल्या उत्तरप्रदेशातील सिद्धार्थनगर जिल्ह्यातील गावात पळून गेला. तेव्हापासून त्याचा शोध मानपाडा पोलीस घेत होते. यातच उत्तर प्रदेशातील सिद्धार्थनगर जिल्ह्यातील कपिलवास्तु इथल्या एका गावात तो लपल्याची माहिती पोलिसांना खबऱ्यानं दिली. त्यामुळे मानपाडा पोलिसांनी नराधमाच्या गुन्ह्याची माहिती युपीमधील गोरखपूर इथल्या एसटीएफ पथकाला दिली. एसटीएफ पथकानं 4 जानेवारी २०२५ रोजी युपीमधील ग्राम मरवटीया कुर्मी गावाच्या हद्दीत सापळा रचून त्याला ताब्यात घेतलं. त्यानंतर कपिलवास्तु पोलीस ठाण्यात त्याला ताब्यात घेतल्याची नोंद करुन ६ जानेवारीला उत्तर प्रदेश पोलिसांनी ताब्यात असलेल्या आरोपीला मानपाडा पोलिसांच्या स्वाधीन केलं आहे. पुढील तपास मानपाडा पोलीस करत असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबने यांनी दिली आहे.



## ओले केस अन् गळ्यात फक्त नेकलेस, मराठी अभिनेत्रीचे बोल्ड फोटो पाहिलेत का?

एका मराठी अभिनेत्रीच्या हॉट व ग्लॅमरस फोटोंची सध्या सोशल मीडियावर जोरदार चर्चा आहे. गळ्यात फक्त एक नेकलेस असलेल्या तिच्या या फोटोने सोशल मीडियावर खळबळ उडाली आहे. इतर फोटोंमध्ये तिचा ग्लॅमरस अंदाज पाहायला मिळत आहे.

सध्या साउथचे सिनेमे जगभर गाजताना दिसत आहेत. यामध्ये आता एक मराठमोळ्या चेहरा देखील सध्या सोशल मिडियावर आपल्या हॉट, बोल्ड लूकमूळे चर्चेत आला आहे. दाक्षिणात्य इंडस्ट्रीत काम करून नाव कमावणारी मराठमोळी अभिनेत्री अश्विनी चवरे सध्या सोशल मीडियावर खूप चर्चेत आहे. अश्विनी चर्चेत असण्यामागचं कारण तिचे ग्लॅमरस फोटो आहेत.

नवीन वर्षाच्या सुरुवातीला अश्विनीने एका हॉट आणि सेन्सेशनल फोटोशूटमधून स्वतःचा असा एक वेगळा लूक प्रेक्षकांसमोर सादर केला आहे, जो यापूर्वी कधीही पाहिला गेला नव्हता. नवीन वर्षात अश्विनीचा हा नवा लूक चाहत्यांसाठी एक सरप्राईज ठरला आहे. तिच्या या बोल्ड लूकने तिचे चाहते थक्क झाले आहेत. सोशल मीडियावर तिच्या या फोटोशूटचे फोटो व्हायरल होत आहेत. तिच्या या फोटोंवर चाहते लाइक्स व कमेंट्सचा वर्षाव करत आहेत.

# सारा अली खानने आंध्र प्रदेशमधील श्रीशैलम मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंगाला दिली भेट



'केदारनाथ' चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण करणारी अभिनेत्री सारा अली खान सोशल मीडियावर प्रचंड सक्रिय आहे. ती तिच्या चित्रपटांच्या पोस्ट तसेच सुट्टीवर गेल्यावर तिथले क्षण चाहत्यांबरोबर शेअर करत असते. साराने तिच्या नवीन वर्षाची सुरुवात भगवान शंकराच्या दर्शनाने केली आहे. तिने 'श्रीशैलम मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग' (आंध्र प्रदेश) या मंदिरात जाऊन घेतलेल्या दर्शनाचे फोटो शेअर केले असून तिच्या चाहत्यांनी या फोटोवर कमेंट करत तिचे कौतुक केले आहे.

सारा अली खानने तिच्या इन्स्टाग्रामवर नवीन वर्षाच्या पहिल्या सोमवारी (२०२५) श्रीशैलम मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंगाच्या भेटीचे काही फोटो शेअर केले. वेगवेगळ्या धार्मिक स्थळांना भेट देणाऱ्या आणि तिथून अपडेट्स शेअर करणाऱ्या साराच्या या फोटोंना चाहत्यांकडून मोठा प्रतिसाद मिळाला आहे.

अलीकडेच सारा अली खानच्या 'स्काय फोर्स' या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला. या ट्रेलरच्या रिलीजच्या दुसऱ्याच दिवशी तिने आंध्र प्रदेशातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्रीशैलम मल्लिकार्जुन मंदिरात जाऊन महादेवाचे दर्शन घेतले. साराने शेअर केलेल्या फोटोमध्ये ती पारंपरिक पांढऱ्या पोशाखात दिसत होती. तिने फोटो पोस्ट करत कॅप्शन लिहिले, "साराच्या वर्षाचा पहिला सोमवार, जय भोलेनाथ." चाहत्यांनी तिच्या पोस्टवर प्रेमाचा वर्षाव केला. एका चाहत्याने लिहिले, "सारासाठी खूप आदर," तर दुसऱ्याने लिहिले, "तुझी महादेवाच्या आशीर्वादाने भरभराट होईल." काही चाहत्यांनी तिच्या आगामी चित्रपटासाठी शुभेच्छा दिल्या. एका चाहत्याने लिहिले, "स्काय फोर्ससाठी शुभेच्छा."

सारा अली खान याआधीही अनेक ज्योतिर्लिंगांना भेट दिली आहे. तिने याआधी 'केदारनाथ', 'उज्जैन' अशा ज्योतिर्लिंगांना भेट दिली आहे. याचे फोटो तिने तिच्या सोशल मीडिया अकाउंटवरून शेअर केले होते. यामुळेच साराच्या या पोस्टवर तिच्या एका चाहत्याने "आणखी एक ज्योतिर्लिंग पूर्ण!!!" आणि "तुझा खूप अभिमान वाटतो." अशी कमेंट केली आहे.

कामाच्या आघाडीवर, सारा अली खान शेवटची 'ए वतन, मेरे वतन' या चित्रपटात दिसली होती. तिचा आता 'स्काय फोर्स' चित्रपट प्रदर्शनासाठी सज्ज आहे, यात तिच्यासह वीर पहारिया, अक्षय कुमार आणि निम्रत कौर यांच्या प्रमुख भूमिका आहे. हा चित्रपट २४ जानेवारी २०२५ रोजी प्रदर्शित होणार आहे. याशिवाय ती 'मेट्रो इन दिनो' चित्रपटात आदित्य रॉय कपूरबरोबर दिसणार आहे.

# विवियन डिसेनाची दुसऱ्या बायकोशी भेट कशी झाली? नूरनने स्वत:च सांगितलं

'प्यार की ये एक कहानी', 'मधुबाला – एक इश्क एक जुनून' आणि 'शक्ती – अस्तित्व के एहसास की' यांसारख्या टीव्ही मालिकांमधून अभिनेता विवियन डिसेना लोकप्रिय झाला. सध्या तो बिग बॉस १८ मध्ये आहे. या शोच्या फॅमिली वीकमध्ये विवियनची पत्नी आली होती. नूरन अली ही इजिप्तमधील पत्रकार असून विवियनची दुसरीर बायको आहे. नूरनने विवियनशी भेट व त्याचा घटस्फोट याबद्दल प्रतिक्रिया दिली आहे.

नूरनने एका मुलाखतीत सांगितलं की तिची व विवियनची भेट कशी झाली. विवियन त्याची पहिली बायको अभिनेत्री वाहबीज दोराबजीबरोबर घटस्फोटाच्या प्रक्रियेतून जात असताना नूरनची विवियनशी भेट झाली होती. विवियनची मुलाखत घेण्यासाठी नूरन प्रयत्न करत होती. दोघांचं संभाषण व्हॉट्सॲपवर सुरू झाला होतं, नंतर ते फोनवर बोलले आणि मग त्यांची प्रत्यक्षात भेट झाली. "त्यावेळी तो शक्तीचे शूटिंग करत होता, पण माझ्या देशात (इजिप्त) मधुबाला मालिका खूप



गाजत होती. ती अरबी भाषेत डब करून एका मोठ्या चॅनेलवर दाखवली जात होती. त्यामुळे या चॅनलने त्याला बोलावायचं ठरवलं. त्यासाठी आम्हाला त्याच्या मुलाखती घ्यायच्या होत्या. मी तेव्हाच्या त्याच्या मॅनेजरला मेसेज केला, पण त्यांनी उत्तर द्यायला खूप वेळ घेतला. नंतर काही कारणांमुळे कार्यक्रम रद्द झाला," असं नूरनने गलाट्टा इंडियाला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं.

नूरन पुढे म्हणाली, "मला माझ्या मॅगझीनसाठी त्याची मुलाखत घ्यायची होती. त्यामुळे मी तीन महिने त्याच्याशी बोलण्याचे प्रयत्न करत राहिले. नंतर शेवटी मी त्याला मेसेज केला की 'लोक म्हणतात की तू अहंकारी आहेस आणि ते खरंय. कारण कोणी तुमच्या कामाबद्दल तुमचा आदर करतं तेव्हा तुम्ही त्यांचा आदर केला पाहिजे.' नंतर त्याने मला उत्तर दिलं आणि सांगितलं की तो तसा नाही. तो खूप व्यग्र आहे, त्यामुळे मी समजून घ्यावं अशी विनंती केली. तसेच एक ते दोन दिवसांत तो मला मुलाखत देईल, असं आश्वासन त्याने दिलं आणि मुलाखत दिली."

विवियनने पहिल्यांदा भावना व्यक्त केल्या होत्या, असं नूरनने सांगितलं. "तो म्हणाला, 'मला तू खूप आवडतेस आणि हे नातं पुढे न्यायचंय, पण मी सध्या एका विचित्र परिस्थितीत आहे.' त्याचा घटस्फोटाचा खटला अजूनही चालू होता. तो म्हणाला, "मी तुला कोणतेही वचन देऊ शकत नाही.



## या आठवड्यात OTT वर रिलीज होणाऱ्या कलाकृतींची यादी, वाचा...

जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात प्रेक्षकांना अनेक चित्रपट व सीरिज ओटीटीवर पाहता येणार आहेत. या आठवड्यात हॉलीवूड, बॉलीवूड आणि अनेक उत्तम वेब सीरिज प्रदर्शित होणार आहेत, ज्या तुम्ही घरबसल्या सहज पाहू शकता. या आठवड्यात कोणते चित्रपट आणि सीरिज डिजिटल प्लॅटफॉर्मवर येणार, त्याची यादी जाणून घेऊयात.

### शार्क टँक इंडिया ४

Shark Tank India ४ : तीन सीझन यशस्वी झाल्यानंतर आता शार्क टँक इंडियाचा चौथा सीझन ६ जानेवारीपासून सुरू झाला आहे. यात प्रेक्षकांना अमन गुप्ता आणि अनुपम मित्तल यांच्यासोबत 'शार्क' पॅनलमध्ये अनेक नवीन शार्क दिसतील. प्रेक्षकांना हा शो सोनी लिव्ह या डिजिटल प्लॅटफॉर्मवर रात्री ८ वाजता पाहता येईल.

### ब्लॅक वॉरंट

Black Warrant on OTT: 'ब्लॅक वॉरंट' ही एक नवीन सीरिज आहे. या सीरिजचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला आहे. या सीरिजमध्ये जहान कपूर दिसणार आहे. तसेच राहुल भट्ट, परमवीर सिंग चीमा, अनुराग ठाकूर, सिद्धांत गुप्ता आणि राजश्री देशपांडे असे कलाकार यात आहेत. विक्रमादित्य मोटवानी दिग्दर्शित ही सीरिज १० जानेवारीपासून प्रेक्षकांना नेटफ्लिक्सवर पाहता येईल.

### द साबरमती रिपोर्ट

The Sabarmati Report : विक्रांत मॅसी स्टारर चित्रपट 'द साबरमती रिपोर्ट' गेल्या वर्षी १५ नोव्हेंबरला थिएटरमध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात गोध्रा घटनेची कथा दाखवण्यात आली आहे. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फारशी कमाल दाखवू शकला नाही. आता हा चित्रपट १० जानेवारी रोजी झी५ वर ओटीटीवर रिलीज होणार आहे.

अमेरिकेत शिकतेय प्रसिद्ध अभिनेत्याची एकुलती एक लेक; म्हणाला, "मी २० तास प्रवास करून गेलो अन् ती..."

### गूजबंप्स: द व्हॅनिशिंग

Goosebumps: The Vanishing on OTT: डेव्हिड श्विमरची ही हॉरर सीरिज त्याच्या दुसऱ्या भागासह परत येणार आहे. ही अँथनी ब्रुअरवर आधारित आहे, जे वनस्पतिशास्त्राचे प्राध्यापक आहेत. ही सीरिज १० जानेवारी रोजी ओटीटी प्लॅटफॉर्म हॉटस्टारवर प्रदर्शित होणार आहे.



## नववर्षाची दणक्यात सुरुवात!

## उमेश कामतने खरेदी केली नवी बाईक

२०२४ ला निरोप देत नव्या वर्षाचं दणक्यात स्वागत केलं गेलं. नव्या वर्षाच्या सुरुवातीलाच अनेक कलाकारांनी गोड बातम्या चाहत्यांना दिल्या. काहींनी घर घेतलं तर कोणी गाडी घेतली. नववर्षाच्या सुरुवातीला दिग्दर्शक रवी जाधव यांनी नव्या घरात गृहप्रवेश केला. तर अभिनेत्री रुपाली भोसलेने मर्सिडीज ही आलिशान कार घेतली. आता उमेश कामतनेही नव्या वर्षाची दणक्यात सुरुवात केली आहे. नववर्षाच्या सुरुवातीलाच उमेशने नवी कोरी बाईक खरेदी केली आहे.

## बॉलिवूडची ही अभिनेत्री रोज दुधाने आंघोळ करते?

बॉलिवूडच्या अनेक अभिनेत्री आहेत ज्या वयाची पन्नाशी ओलांडल्या तरीही अजूनपण अतिशय सुंदर दिसतात. अनेकदा चाहत्यांना त्यांच्या ब्युटी टिप्स जाणून घेण्याची उत्सुकता असते. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला अशाच एका सौंदर्याविषयी सांगणार आहोत, जिने वयाच्या ४९ वर्षे ओलांडली तरीही ती आताच्या नवोदित अभिनेत्रींनाही मागे टाकते.

बॉलिवूडचा एक नवीन चेहरा बनलेली आणि सेलिब्रिटींची खास मैत्रिण असलेली अभिनेत्री ती म्हणजे शालिनी पासी. शालिनी तिच्या संपत्तीसाठी ओळखली जाते. भारतातील श्रीमंत उद्योगपतीची पत्नी म्हणूनही शालिनीला ओळखलं जातं. शालिनी पासीला 'फेब्युलस लाईव्हज ऑफ बॉलीवूड वाइव्हज'मध्ये प्रेक्षकांनी खूप पसंती दिली होती. याठिकाणी तिने तिचे प्रोफेशनल लाईफ, पर्सनल लाईफ आणि ब्युटीबद्दल सांगितले. या शोदरम्यान शालिनीने दावा केला होता की ती दुधाने आंघोळ करते, ज्याबद्दल नुकत्याच झालेल्या



एका मुलाखतीदरम्यान प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. की ती खरोखर दुधाने आंघोळ करते का?शालिनीने याचे उत्तर देताना सांगितले, 'मी दुधाने आंघोळ करत नाही. मला शोमध्ये काहीही स्पष्ट करायचे नव्हते. म्हणूनच ते जे काही विचारतील त्याला 'हो' उत्तर द्यायची. आमच्या भागात गाई, घोडे किंवा बकरी पाळण्यास मनाई आहे, त्यामुळे दुधाने आंघोळ करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. असं म्हणतं तिने रोज दुधाने अंघोळ करत असल्याची चर्चा ही केवळ अफवाच असल्याचं म्हटलं आहे. शालिनीच्या मते तजेलदार आणि निरोगी त्वचेसाठी घरगुती उपचारच उत्तम आहेत. घरगुती उपायांनीच ती त्वचेची काळजी घेते, रोज बीटरूट स्मूदी पिते असे देखील ती म्हणाली. बिटामुळे त्वेचला नैसर्गिक चमक येते असे तिचे म्हणणं आहे. याआधी शालिनी एका मुलाखतीत म्हणाली होती, 'माझा नेहमी निसर्ग आणि साधेपणावर विश्वास आहे. माझ्या आई आणि आजीने मला स्वयंपाकघरातील वस्तूंपासून उपाय करायला शिकवले आणि मी ते माझ्या आयुष्यात स्वीकारायला सुरुवात केली.

# सोनू निगमच्या स्वरांचा साज अन् सुबोध-वैदेहीचा रोमँटिक अंदाज!



'संगीत मानापमान' सिनेमाची चांगलीच चर्चा आहे. हा सिनेमा पुढील काहीच दिवसांमध्ये थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. 'संगीत मानापमान' सिनेमातील गाणी, कलाकारांचा अभिनय या सर्व गोष्टींची सध्या चांगलीच उत्सुकता आहे. 'संगीत मानापमान' सिनेमातील गाण्यांची सध्या चांगलीच चर्चा आहे. अशातच 'संगीत मानापमान'मधील चंद्रिका हे नवीन गाणं प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या गाण्यात सुबोध-वैदेहीचा रोमँटिक अंदाज लक्ष वेधून घेतोय.

'चंद्रिका.. तव रूपाने या धरतीवर अवतरली.. तुला भेटता.. शतजन्मांची कोडी मजला उलगडली...', असे शब्द असलेलं हे गाणं काहीच तासांपूर्वी युट्यूबवर रिलीज झालं. सुबोध भावे-वैदेही परशुरामी यांचा कधीही न पाहिलेला रोमँटिक अंदाज सिनेमात पाहायला मिळतोय. सुप्रसिद्ध गायक सोनू निगम यांच्या सुमधुर आवाजातील हे रोमँटिक गाणं सध्या चर्चेत आहे. समीर सामंत यांचे हृदयस्पर्शी गीत आणि शंकर एहसान लॉय या तिकडीचे अप्रतिम संगीत यांची अनोखी जोड या गाण्याला आहे. अल्पावधीत हे गाणं प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलं आहे.




**मेष** – आपली कर्मठता आणि उत्साही दृष्टिकोनामुळे नवी दारे उघडली जातील, पण संयमाची आवश्यकता आहे.

**वृषभ** – व्यक्तिमत्त्व विकासासाठी योग्य वेळ आहे. रिलेशनशिपमध्ये समजूतदारपणा आवश्यक आहे. प्रकृती जपा.

**मिथुन** – तुमच्या सर्जनशीलतेला वाव मिळेल. भविष्यात काही आव्हाने असतील, पण तुम्ही चांगल्या प्रकारे तोंड द्याल.

**कर्क** – भावनिक स्थितीवर लक्ष ठेवून काम केल्यास यश मिळेल. काही अडचणी येतील, पण त्यावर मात केली जाईल.

**सिंह** – करियरच्या दृष्टीने महत्त्वाचे निर्णय घेण्याची वेळ येईल. भावनिकदृष्ट्या संतुलन राखणे आवश्यक आहे.

**कन्या** – यश मिळवण्यासाठी अधिक समर्पण आणि समजूतदारपणा आवश्यक आहे. आर्थिक स्थिती सुधारू शकते.

**तुळ** – नातेसंबंध निर्माण होऊ शकतात, परंतु धैर्याची आवश्यकता आहे. आपल्या अंतर्गत शक्तींवर विश्वास ठेवा.

**वृश्चिक** – सर्व प्रकारच्या चिंतांपासून दूर राहा. काही अवघड परिस्थिती येऊ शकते, परंतु त्यावर मात करू शकाल.

**धनु** – करियरमध्ये प्रगती होईल. आर्थिक समृद्धी दिसत आहे, पण त्यासाठी कठोर परिश्रमाची आवश्यकता आहे.

**मकर** – कुटुंबातील सदस्यांसोबत जास्त वेळ घालवू शकता. तुमच्या कामामध्ये नवा दृष्टिकोन आणाल. खरेदी कराल.

**कुंभ** – तुमच्या सर्जनशीलतेला वाव मिळेल. आपल्या भावनिक स्वास्थ्यावर लक्ष ठेवणे आपल्यासाठी महत्त्वाचे आहे.

**मीन** – कार्यक्षेत्रात यश मिळवण्यासाठी मेहनत व शांतता दोन्ही आवश्यक आहे. व्यवसाय, अध्ययनात प्रगती होईल.

# महाराष्ट्रात HMPV चा शिरकाव ?

## नागपूरमधील दोन संशयित रुग्ण आजारातून ठणठणीत बरे !



**नागपूर (नितीन देवळेकर):** चीनमध्ये झपाट्यानं वाढणाऱ्या HMPV व्हायरसनं आता महाराष्ट्रात शिरकाव करणार असल्यानं चिंता वाढली आहे. गुजरात, तामिळनाडूनंतर आता नागपूरमध्येही HMPV व्हायरसचे दोन संशयित रुग्ण आढळले आहेत. नागपूरमधील संशयित रुग्णांमध्ये ७ वर्षीय मुलगा आणि १३ वर्षीय मुलीचा समावेश असल्याचं सांगितलं जातंय. या दोन्ही मुलांना खोकला आणि ताप होता. यावर उपचारासाठी ते खासगी रुग्णालयात गेले होते. दोन्ही मुलांना रुग्णालयामध्ये दाखल करण्याची गरज पडली नाही. दोन्ही मुलांवर उपचार करुन त्यांना घरी सोडण्यात आलंय. दोन्ही रुग्ण आजारातून बरे झाले आहेत.

एचएमपीव्ही हा एक श्वसन संसर्गजन्य आजार असून तो वरचा आणि खालचा श्वसन मार्ग प्रभावित करतो. हा प्रामुख्यानं लहान मुले, वयोवृद्ध आणि कमकुवत प्रतिकारशक्ती असलेल्या लोकांना प्रभावित करतो. ५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या ९० टक्के लोकांमध्ये एचएमपीव्ही संसर्गाचे पुरावे सापडतात, तर ३ महिन्यांपेक्षा कमी वयाच्या ९० टक्के बाळांमध्ये एचएमपीव्ही अँटीबॉडीज आढळतात. एचएमपीव्हीमध्ये खोकला, सर्दी, ताप तसंच श्वसनास त्रास होणे अशी लक्षणं आढळतात. हा संसर्ग श्वसन थेंबांमुळं किंवा दूषित पृष्ठभागांच्या संपर्कातून पसरतो. हा संसर्ग सौम्य फ्लूसारखा असून तो तीव्र स्वरूप देखील घेऊ शकतो. जसं की श्वास घेताना त्रास होणे, ऑक्सिजनची कमतरता, किंवा दमा वाढणे.

### कशी काळजी घ्यावी?

- कमीत कमी २०सेकंद साबणानं वारंवार हात धुवावे
- हात धुतल्याशिवाय हातांनी डोळे, नाक आणि तोंडाला स्पर्श करू नये.
- संक्रमित लोकांपासून दूर रहावं.
- सर्दी-खोकल्याचा त्रास असणाऱ्यांनी मास्क वापरावे.
- खोकताना, शिंकताना तोंड आणि नाक झाकावे.
- या विषाणूची लागण झालेल्या लोकांनी घराबाहेर पडू नये.

# तिबेटमध्ये भूकंपाने हाहाकार, ३२ जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली (प्रगती शर्मा) :** साखरझोपत असतानाच नेपाळ-तिबेट बॉर्डरजवळ भूकंपाचे तीव्र हादरले बसले. एका तासाच्या अंतरात एका मागून एक सहा भकूंप झाले. युनायटेड स्टेट्स जिओलॉजिकल सर्व्हेनुसार (USGS), नेपाळ-तिबेट सीमेजवळ लोबुचेच्या 93 किलोमीटर ईशान्येला सकाळी ६:३५ वाजता भूकंप झाला. त्याची तीव्रता ७.१ रिश्टर स्केल इतकी होती. यामध्ये आतापर्यंत ३२ जणांनी जीव गमावल्याचे समोर आलेय.



अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत. पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे इमारती कोसळल्याचे व्हिडीओत दिसत आहे. सकाळी ६.३५ वाजता ७.१ रिश्टर स्केलचा भूकंप झाल्याची नोंद झाली. यूएस जिओलॉजिकल सर्व्हे (USGS) नुसार, नेपाळपासून सुमारे ९३ किमी ईशान्येस तिबेटमधील लोबुचे हे भूकंपाचा केंद्र असल्याचे समोर आले.

रॉयटर्सने दिलेल्या वृत्तानुसार, भूकंपामुळे तिबेटमध्ये मालमत्तेची मोठओी हानी झाली आहे, इमारती कोसळल्या आहेत. आतापर्यंत या भूकंपामध्ये ३२ जणांचा मृत्यू झालाय. अनेक इमारतींसह पायाभूत सुविधांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेय. या भूकंपाचे धक्के भारतमधील बिहार, दिल्ली, उत्तरप्रदेश आणि पश्चिम बंगालमध्येही जाणवले. त्याशिवाय नेपाळ, बांगलादेश आणि भूतानच्या अनेक भागातही भूकंपाचे हादरे जाणवले. नेपाळची राजधानी काठमांडूमध्ये भूकंपाचे जोरदार धक्के जाणवल्यानंतर लोक घराबाहेर पडले आणि रस्त्यावर मोकळ्या जागेवर गेले. नागरिक झोपेत असताना अचानकच भूकंपाचे धक्के जाणवले, त्यामुळे भीतीचे वातावरण होते. भूकंपाची तीव्रता प्रचंड मोठी होती.

SPORT

# Star India Batter Opts Out Of Vijay Hazare Trophy Despite Repeated Domestic Cricket Reminders: Report

**NEW DELHI :** Even as experts and former Indian cricketers keep reiterating the importance of domestic cricket to flourish on the international stage, India opener KL Rahul has reportedly opted out of the remainder of the Vijay Hazare Trophy, as he takes a break post a gruelling one and a half months of Test cricket Down Under. Thus, Rahul will not feature for Karnataka in the VHT knockouts.

According to a report in Sportstar, the star India opener, who featured in all five Tests against Australia, will take a break. A call on Rahul's availability for the second leg of the Ranji Trophy, which starts on January 23, will be taken later.

Notably, batter Devdutt Padikkal and pacer Prasidh Krishna, both of whom were in the Test team in Australia, will turn up for Karnataka in Vadodara. While the former played the first Test in Perth, Krishna earned a call-up for the fifth and final Test.





Rahul, who has been often criticised for his form and performances, scored a crucial 77 runs in India's win in Perth. Although Adelaide was a dampener, he scored a crucial 84 in India's first innings in Gabba. But his next four innings accounted for 24, 0, 4 and 13, as criticism flew in again.

Rahul was part of India's squad that played three ODIs in Sri Lanka and he is expected to be named in the squad for the England series, with the first ODI starting on February 6. He has scored 4861 runs in 124 List A matches, at an average of 46.29 and with 11 hundreds to his name.

After India were thrashed 1-3 in the Border-Gavaskar Trophy, several former cricketers repeated that playing domestic cricket, especially Ranji Trophy, becomes crucial even for big stars.



## 'He's sitting at NCA for I don't know how long': Ravi Shastri slams BCCI, blames them for Mohammed Shami's poor recovery

Former India head coach Ravi Shastri has no doubts that Mohammed Shami's presence towards the latter half of the Border-Gavaskar Trophy would have made a difference in the outcome of the series, which Australia won 3-1 despite losing the first Test in Perth. Shami, who hasn't played international cricket since the ODI World Cup final in November 2023, made a comeback to competitive cricket in the Ranji Trophy for Bengal, giving rise to hopes of a late entry into India's squad in Australia.Shami bowled 43 overs in Bengal's Ranji Trophy match against Madhya Pradesh in November 2024. Following this, he played in all nine games of the Syed Mushtaq Ali Trophy (SMAT), where he also engaged in additional bowling sessions on the sidelines to build his bowling volume and prepare for the Test matches. However, three days before the Boxing Day Test in Melbourne, when the series was still locked 1-1, BCCI confirmed that Shami will not be considered for the remaining two Tests in Australia.

## He Could Have Been The Difference': Ponting Questions 34-Year-Old Star's Absence From India's BGT Squad

**NEW DELHI :** Former Australian captain Ricky Ponting feels India missed the trick by not flying Mohammed Shami for the last two matches of the Border-Gavaskar Trophy. According to the 50-year-old former batter, had Shami played in the last two matches when the series was level at 1-1, he could have been the difference.



"I was really surprised when he (Shami) wasn't flown out even halfway through the series, two Test matches in," Ponting said in the latest episode of The ICC Review.

"India's make-up obviously had Nitish Reddy there. So, you had another seam bowling all-rounder anyway. So, if Shami, even if he wasn't fully fit, if he had to bowl fewer overs in a day, you had a backup seam bowling option to help him out, and I think he could have been the difference," he added.

Ponting, who has donned the hat of an expert, commentator, and coach after calling time on his playing career, says that Shami is very important for Team India, and if he was there (in Australia) with Jasprit Bumrah and Mohammed Siraj, then things could have been completely different. "When you asked me (in an earlier The ICC Review) at the start about what I thought the result would be, I said 3-1 Australia because Shami wasn't there. That was the first thing I said. That's how important I felt he was to India. If Shami, Bumrah, and Siraj were in their starting team, I think things could have been completely different here in Australia."

Former India head coach Ravi Shastri echoed Ponting's views and said Shami could have provided adequate help for Bumrah.

"It got so tight at 1-1 going into Melbourne. You just needed that experience and support. For all you know, he might have raised the bar as well. And it would have been the two guys there (Bumrah and Shami)."

"Pat Cummins couldn't have done it on his own; Scotty Boland had to step in. So, you needed a bowler of his experience. You know, as hard as Mohammed Siraj tried, you needed Shami's experience there," he added.





## Sumit Nagal qualifies for ASB Classic in big boost before Australian Open

Sumit Nagal has qualified for the main draw of the ASB Classic in Auckland. On Sunday, January 5, India's top-ranked player defeated France's Adrian Mannarino 7-6 (7-5), 6-3 in the second round of the Qualifiers. In the opening round, Nagal had to come back from behind to beat New Zealand's Alexander Klintcharov 1-6, 6-3, 6-1 before taking down his French opponent.

In the main draw, Nagal, ranked No.98 in the world, will be up against Alex Michelsen of the United States. The main draw qualification will give the 27-year-old a massive boost before the Australian Open, which is scheduled to get underway later this month. Last year, in July, Nagal achieved his career-best ranking of No.68, but has gone down in the rankings since then.

The main draw competition will serve as good preparation for Nagal ahead of the hard-court major at Melbourne Park, the season's first Grand Slam. Nagal has happy memories of playing in the Australian Open after he defeated Alexander Bublik in the opening round of the main draw.

# 3 Bowlers Who Can Replace Jasprit Bumrah In India's Champions Trophy 2025 Squad

**NEW DELHI :** The 2025 edition of the ICC Champions Trophy is set to start on February 19 with a match between hosts Pakistan and New Zealand at National Stadium in Karachi. India will open its campaign on February 20 against Bangladesh at Dubai International Cricket Stadium and then face arch-rivals Pakistan in the second match on February 23. India's third and final Group A match is scheduled to take place at the same venue on March 2, and if India manages to finish in the top two, the Men in Blue's semifinal match will also take place in Dubai on March 4.

India is set to announce the 15-member squad for the ICC event, which is making a comeback after eight years, on Sunday, January 12, and it will be interesting to see if Jasprit Bumrah manages to find a place in the squad. The 31-year-old





fast bowler, who picked up 32 wickets in the recently concluded five-match Test series against Australia, last played a 50-over match for India on November 19, 2023, against Australia during the ODI World Cup 2023 final at Narendra Modi Stadium in Ahmedabad.

Bumrah is dealing with a back spasm these days, and due to that he didn't bowl in the second innings of the Sydney Test as well. There are question marks over his availability for the Champions Trophy as the full extent of his back injury is yet to be determined.

If Bumrah misses out, it will be a big setback for Team India, as he has been in red-hot form these days and is taking wickets for fun.

With Mohammed Shami, Mohammed Siraj, and Arshdeep Singh almost certain to get picked, here's a look at three fast bowlers who can replace Jasprit Bumrah in India's Champions Trophy 2025 squad: Avesh Khan: Avesh Khan has 9 wickets to his name in eight ODIs played so far. He played in all three matches of the away series against South Africa in December 2023 and accounted for the dismissal of four batters for 27 runs in his quota of eight overs.

Prasidh Krishna: Prasidh Krishna has dismissed 29 batters in 17 ODIs for India. The 28-year-old pacer from Karnataka was part of India's ODI World Cup 2023 squad. Krishna last played for India in the Sydney Test against Australia and picked up three wickets each in both innings.

# दिल्ली विधानसभेची निवडणूक ५ फेब्रुवारीला आणि निकाल ८ फेब्रुवारीला, निवडणूक आयुक्तांची घोषणा




● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

नव्या वर्षात दिल्लीत निवडणूक होते आहे. दिल्लीत देशाचं चित्र एकवटलेलं पाहण्यास मिळते. प्रत्येक संस्कृतीचं दर्शन या ठिकाणी होतं. दिल्लीकर यावेळी उत्तम प्रकारे मतदान करतील अशी आशा आहे असं मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी म्हटलं आहे. दिल्लीमध्ये ७० विधानसभेच्या जागा आहेत. १.५ कोटी हून अधिक उमेदवार दिल्लीत आहेत. २.०८ लाख मतदार असे आहेत जे पहिल्यांदा मतदान करणार आहेत. एका टप्प्यात दिल्लीची निवडणूक होणार आहे. ५ फेब्रुवारीला दिल्ली विधानसभेसाठी मतदान होणार तर ८ फेब्रुवारीला निकाल लागणार आहे अशी घोषणा मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी केली. निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद सुरु झाली आहे.

## आप, काँग्रेस आणि भाजपा असा तिरंगी सामना

खरंतर आप आणि काँग्रेस हे दोन्ही पक्ष लोकसभा निवडणूक एकत्र लढले होते. मात्र विधानसभा निवडणुकीत दोन्ही पक्ष वेगळे झाल्याचं दिसून येतं आहे. अजय माकन यांनी अरविंद केजरीवाल यांचा उल्लेख देशद्रोही असा केला होता. त्यानंतर या प्रकरणावरुन दिल्लीचं राजकारण तापलेलं पाहण्यास मिळालं. दुसरीकडे अरविंद केजरीवाल यांच्या शीशमहल या घरावरुन मोदी आणि अमित शाह हे सातत्याने केजरीवालांवर टीका कत आहेत. त्यामुळे या निवडणुकीत काय होणार? हे पाहणं नक्कीच महत्त्वाचं असणार आहे.

## अरविंद केजरीवाल नवी दिल्लीतून लढवणार निवडणूक

माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यावेळीही नवी दिल्लीतून विधानसभा निवडणूक लढवणार आहेत. त्यांचा सामना काँग्रेसचे संदीप दीक्षित आणि भाजपच्या प्रवेश वर्मा यांच्याशी आहे. केजरीवाल मागच्या दोन निवडणुकीत इथूनच जिंकून विधानसभेत आले. नवी दिल्ली ही VIP सीट आहे. भाजप आणि काँग्रेस दोघांनी आपल्या स्टार नेत्यांना उतरवलं आहे. इथे सामना रंगतदार असणार आहे. मुख्यमंत्री आतिशी कालकाजीमधून विधानसभा निवडणूक लढवत आहे. त्यांचा सामना काँग्रेसच्या अलका लांबा आणि दक्षिण दिल्लीचे माजी भाजप खासदार रमेश बिधूडी यांच्याशी आहे.

# मनसे पक्षात मोठे फेरबदल होणार



● मुंबई, विशाल कारंडे :

नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकात महाराष्ट्र नवनिर्माण सेना अर्थात मनसेला एकही जागा जिंकता आली नाही. त्यामुळे पक्षाच्या कार्यपद्धती व पुढील वाटचालीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ लागले होते. तसेच, मनसे-ठाकर गट एकत्र येण्याच्याही चर्चांना उधाण आलं होतं. या पार्श्वभूमीवर मनसेबाबत मोठी अपडेट समोर आली असून पक्षात मोठे फेरबदल होणार असल्याची माहिती समोर आली आहे. मनसे नेते संदीप देशपांडे यांनी प्रसारमाध्यमांना यासंदर्भातली माहिती दिली आहे. काही दिवसांपूर्वीच मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी कार्यकर्ते, पदाधिकारी व नेत्यांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा देताना मागच्या निवडणुकांमध्ये जे झालं ते विसरून पुढे वाटचाल करण्यासंदर्भात आवाहन केलं होतं.

## बैठकीबाबत काय म्हणाले संदीप देशपांडे?

■ दरम्यान, या बैठकीनंतर संदीप देशपांडे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी बैठकीत आगामी पालिका निवडणुकांसंदर्भात व्यापक चर्चा झाल्याचं संदीप देशपांडे यांनी सांगितलं. "आता विधानसभा निवडणुका झाल्या. पण येणाऱ्या महानगर पालिका निवडणुकांना कशा पद्धतीने सामोरं जायचंय यासाठी आज मुंबईच्या सर्व विभाग अध्यक्षांची बैठक बोलावली होती. त्यात सर्व नेतेही उपस्थित होते. लवकरच येत्या काही दिवसांत पक्षात पूर्ण रिफॉर्म करण्याचा निर्णय राज ठाकरेंनी घेतला आहे. तो बदल कसा असेल, हे येत्या काही दिवसांत दिसेल. बऱ्याच गोष्टींच्या बाबतीत हे बदल झालेले पाहायला मिळतील", असं सूचक विधान संदीप देशपांडे यांनी केलं आहे.

# स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त युवकांसाठी उद्योजकता प्रेरणा कार्यक्रमाचे आयोजन

● रायगड, फरीद डावरे :



दि.१२ जानेवारी हा दिवस स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त राष्ट्रीय युवा दिन म्हणून संपूर्ण राष्ट्रामध्ये साजरा करण्यात येतो. त्यानुषंगाने युवकांच्या विविध गुणांना तसेच कौशल्यांना वाव व प्रोत्साहन मिळावे यासाठी वीर मुरारबाजी देशपांडे, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महाड येथे दि. १२ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता युवकांसाठी उद्योजकता प्रेरणा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमासाठी मान्यवर व्यक्ती तसेच मार्गदर्शन करण्यासाठी यशस्वी उद्योजक आणि व्याख्याते उपस्थित राहणार आहेत, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून उत्तीर्ण झालेल्या माजी प्रशिक्षणार्थी व त्यांचे पालक यांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित, रहावे असे आवाहन संस्थेचे प्राचार्य एन. एस. पुरकर यांनी केले आहे.

# मुख्यमंत्री फडणवीस यांचा अधिकाऱ्यांसाठी सात कलमी कृती कार्यक्रम

■ 'सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर करा'
■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, पोलिस आयुक्त, पोलिस अधीक्षक यांच्याशी दुरदृष्य (व्हीसी) प्रणालीद्वारे संवाद

● मुंबई, विशाल पाटील :



सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे ( ईज ऑफ लिव्हिंग) यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज राज्यातील सर्व अधिकाऱ्यांना सात कलमी कृती कार्यक्रम निश्चित करुन दिला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षक यांच्याशी दुरदृष्य (व्हीसी) प्रणालीद्वारे संवाद साधला.

यावेळी त्यांनी राज्यातील प्रशासनाला येत्या शंभर दिवसांत प्राधान्याने करावयाची कामे याबाबत सविस्तर सूचना दिल्या. या सूचनांवर काय कार्यवाही केली याबाबत १५ एप्रिल २०२५ रोजी आढावा घेतला जाईल, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सर्व मंत्री उपस्थित होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, आपल्या कार्यालयाचे संकेतस्थळ सुसज्ज करा, माहिती अधिकार कायद्यानुसार मागितली जाईल अशी सर्व माहिती अगोदरच संकेतस्थळावर उपलब्ध करून द्या. संकेतस्थळ सायबरदृष्ट्या सुरक्षित करा. शासकीय कार्यालयांची स्वच्छता करा, अनावश्यक कागदपत्रे काढून टाका, खराब आणि वापरात नसलेली वाहने निर्लेखित करावीत.

शासकीय कार्यालयात येणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याचे पाणी, प्रसाधनगृह स्वच्छ राहतील, हे सुनिश्चित करा. अधिकाऱ्यांच्या अचानक भेटी होतील, त्यावेळी ते स्वच्छ दिसले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचना

■ विभाग, कार्यालयाचे वेबसाईट अद्ययावत करा
■ ईज ऑफ लिव्हिंग संकल्पनेवर काम करा
■ शासकीय कार्यालयात स्वच्छता मोहिम राबवा
■ नागरिकांच्या तक्रारी, प्रलंबित प्रकरणे निकाली काढा
■ उद्योजकांना त्रास होणार नाही याची काळजी घ्या
■ शासनाच्या महत्वाच्या प्रकल्प आणि योजनांच्या प्रकल्पांना भेटी द्याव्यात
■ शासकीय कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना सोयी सुविधा उपलब्ध करून द्या

# एचएमपीव्ही आजाराबाबत सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचे नागरिकांना आवाहन

● मुंबई, राकेश गायकवाड :



एच.एम.पी.व्ही (ह्यूमन मेटा न्युमो) हे श्वसन विषाणू नवीन नसून २००१ पासून प्रचलित आहेत. हा नवीन आजार नसून आधीपासून अस्तित्वात असलेला आहे. या आजारातील विषाणू रुपांतरीत होत नाही. नागरिकांनी कुठल्याही प्रकारे घाबरून जावू नये. वैयक्तिक स्वच्छता पाळून काळजी घ्यावी, असे आवाहन वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ आणि सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी मंत्रालयात संयुक्तरीत्या आयोजित पत्रकार परिषदेमध्ये केले.

पत्रकार परिषदेला सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, विभागाचे सचिव डॉ निपुण विनायक, सचिव नवीन सोना, आरोग्य विभागाचे संचालक डॉ. नितीन अंबाडेकर उपस्थित होते.

केंद्र शासनाच्या याबाबतीत येत असलेल्या दिशा निर्देश आणि मार्गदर्शनानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. या आजाराबाबत कोणीही अफवा पसरवू नये. नागरिकांनी वस्तुस्थिती लक्षात घेत अफवांवर विश्वास ठेवू नये. लहान मुले, वयोवृद्ध, दुर्धर आजार असलेल्या रुग्णांची काळजी घेणे गरजेचे आहे. आजाराच्या संदर्भामध्ये आरोग्य विभागाचे संपूर्ण पथक कार्यरत असून लवकरच विशिष्ट कार्यपद्धती जाहीर करण्यात येईल. राज्यात आरोग्य विभागाची चांगली व्यवस्था असून यंत्रणा सज्ज आहेत. असे सार्वजनिक आरोग्य मंत्री आणि वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले.

या आजाराबाबत आरोग्य विभागाचे सचिव डॉ निपुण विनायक म्हणाले, सध्या चीनमध्ये श्वसनविषयक आजाराच्या विषाणूबाबत समाजमाध्यमावर माहिती येत आहे. चीनमध्ये हिवाळी वातावरणामुळे श्वसन संसर्गाची वाढ अनैसर्गिक नाही. इन्फ्ल्यूंझा, आर. एस. व्ही, एचएमपीव्ही यासारखे विषाणू कारणीभूत आहेत. हे विषाणू भारतासह जगामध्ये पहिल्यापासून प्रचलित आहे.

एचएमपीव्ही हा साधारणतः सौम्य आजार आहे. ज्यामध्ये सर्दी, खोकल्यासारखी लक्षणे असतात. लहान मुले, वृद्ध आणि कमकुवत प्रतिकार शक्ती असलेल्या लोकांना आजाराचा जास्त धोका असू शकतो.

## नागरिकांना श्वसनाच्या संसर्गापासुन बचाव करण्यासाठी ही काळजी घ्यावी

■ जेव्हा आपल्याला खोकला किंवा शिंका येत असेल तेव्हा आपले तोंड आणि नाक रुमाल किंवा टिश्यू पेपरने झाकून ठेवा
■ आपले हात वारंवार धुवा.
■ ताप, खोकला आणि शिंका येत असल्यास सार्वजनिक ठिकाणांपासून दूर राहा.
■ भरपूर पाणी प्यावे आणि पौष्टिक खावे
■ संक्रमण कमी करण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी उदा. शाळा व कार्यालये इ. ठिकाणी हवा खेळती असावी.
■ हस्तांदोलन टिश्यू पेपर आणि रुमालाचा पुनर्वापर टाळावा.
■ आजारी लोकांशी जवळचा संपर्क नसावा.
■ डोळे, नाक आणि तोंडाला वारंवार स्पर्श करू नये.
■ सार्वजनिक ठिकाणी थुंकू नये.
■ डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषध (सेल्फ मेडिकेशन) घेणे टाळावे.
■ सर्दी व खोकला झाल्यास गर्दीच्या ठिकाणी जाऊ नये.

# शेतकऱ्यांच्या मदतीला आता बळीराजा मदतवाहिनी

## फसवणुकीच्या ९०० पेक्षा अधिक तक्रारी

● नाशिक, सचिन कदम :



शेतकऱ्यांना फसवणुकीच्या तक्रारी करता याव्यात, यासाठी बळीराजा ही मदतवाहिनी कार्यान्वित करण्यात येत आहे. सद्यस्थितीत आर्थिक गुन्हे शाखा यासंदर्भातील तक्रारी जमा करत यावर काम करत आहे. केवळ नाशिक जिल्ह्यातून ९०० हून अधिक तक्रारी प्राप्त झाल्या असून फसवणुकीचा आकडा ४२ कोटींच्या घरात आहे. यातील एक कोटी रुपये शेतकऱ्यांना परत देण्यात यश आले आहे.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या फसवणुकीचे वाढते प्रकार पाहता कृषिमंत्री ॲड. माणिक कोकाटे यांनी या प्रकरणात लक्ष घातले आहे. द्राक्ष, टोमॅटो, कांदा उत्पादकांची बऱ्याचदा परप्रांतीय तर, कधी स्थानिक व्यापाऱ्यांकडून फसवणूक होते. शेतकऱ्यांकडून घेतलेल्या मालाला पैसे देण्याचा वायदा होतो. परंतु, आश्वासन न पाळता संशयितांकडून शेतकऱ्यांची फसवणूक होते. शेतकऱ्यांच्या बांधावर द्राक्ष खरेदीच्या वेळी भाव, वजन अशा वेगवेगळ्या माध्यमातून फसवणूक करण्यात येत असते. शेतकऱ्यांची होणारी ही अडवणूक लक्षात घेता याआधी जिल्ह्याचे तत्कालीन पोलीस अधीक्षक सचिन पाटील यांनी पुढाकार घेतला होता. यानंतर काही काळ काम थंडावले. मात्र मागील आठवड्यात कृषि मंत्री कोकाटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत पुन्हा एकदा शेतकरी फसवणुकीचा विषय चर्चेत आला. फसवणूक झाल्यावर शेतकऱ्यांना न्याय मिळण्यासाठी नाशिक जिल्हा पोलिसांच्या वतीने बळीराजा ही मदतवाहिनी सुरू करण्यात येत आहे. तत्पूर्वी आर्थिक गुन्हे शाखेकडे फसवणुकीचे तक्रार अर्ज मागवण्यात येत आहेत. सद्यस्थितीत नाशिक जिल्ह्यातून ९०० हून अधिक तक्रार अर्ज प्राप्त झाले आहेत.

# 'आरोपींना मोक्का लावा, त्यांचा 'तेरे नाम' मधील सलमान झाला पाहिजे'- सुरेश धस



● बीड, दिगंबर जाधव :

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी राज्यभरात मोर्चे काढण्यात येत आहेत. आज मुंबईत सरपंच परिषदेचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी भाजपा आमदार सुरेश धस सहभागी झाले होते. यावेळी आमदार धस यांनी देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपींना मोक्का लावण्याची मागणी केली. सरपंच परिषदेत बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले, सरपंच संतोष देशमुख यांचा गुन्हा काय होता? गावातील एका दलित वॉचमनला मारहाण होताना तो रोखायला गेला होता, खंडणी मागणाऱ्यांना विरोध केला म्हणून त्याची निर्घुन हत्या केली, असा आरोपही सुरेध धस यांनी केला.

## 'आरोपींचा 'तेरे नाम' झाला पाहिजे'

"कितीही वेळ होऊद्या देशमुख यांना तुमच्या मनातून जाऊ देऊ नका. ग्रामपंचायतीचे प्रमुख म्हणून तुम्ही आलात. आरोपींना मोक्का लागला पाहिजे, ३०२ मध्ये गेले पाहिजेत. ते बिन भाड्याच्या खोलीत गेले पाहिजेत. त्यांचे नातेवाईत सुद्धा तिथे गेले नाहीत पाहिजे. त्यांचा 'तेरे नाम' झाला पाहिजे, सलमान खान सारखी यांची अवस्था झाली पाहिजे, असंही आमदार धस म्हणाले.

# नवेगावबांध व चांदपूर पर्यटक निवास पर्यटकांसाठी पर्वणी ठरेल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ एमटीडीसीच्या नवेगावबांध व चांदपूर पर्यटक निवासाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण

● मुंबई, विशाल कारंडे :



विदर्भाच्या गोंदिया जिल्ह्यामधे एमटीडीसीचे नवेगावबांध व भंडारा जिल्ह्यातील चांदपूर पर्यटक निवास पर्यटकांसाठी पर्वणी ठरेल, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. मंत्रालय येथील मंत्रिमंडळ बैठकीनंतर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या नवेगाव बांध व चांदपूर पर्यटक निवासाचा लोकार्पण सोहळा आभासी पद्धतीने झाला. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई,पर्यटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक,पर्यटन विभागाच्या सचिव जयश्री भोज, पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनोजकुमार सूर्यवंशी यावेळी उपस्थित होते.

## नवेगाव बांध - एक आदर्श पर्यटनस्थळ

गोंदियापासून ६५ कि.मी. वर नवेगावबांध येथे राष्ट्रीय पक्षी उद्यान आहे. वनश्रीने नटलेल्या या उद्यानाचा परिसर १६५ चौ.कि.मी. आहे. येथील तलाव व वनक्षेत्र पक्षांसाठी आकर्षणाचे केंद्र आहे. येथे सैबेरियासारख्या अतिदूर प्रदेशातून येणारे पक्षी विशिष्ट हंगामात दरवर्षी येतात. नवेगांवबांध हा तलाव ११ वर्ग कि.मी. परिसरात पसरलेला आहे.

नवेगावबांध

## सर्वसोयीसुविधा युक्त पर्यटक निवास

नवेगावबांध या पर्यटनस्थळी पर्यटकांना राहण्याकरिता महामंडळाने प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतून रु. २१.०० कोटीच्या निधीतून उत्तम सुविधेने सज्ज असलेले पर्यटक निवास चांदपूर या नावाने सुरू केलेले आहे. येथे व्हीआयपी सूट, डिलक्स सूट, स्टॅंडर्ड सूट आणि ८ बेडेड डॉर्मिटरी, उपहारगृह आणि मनोरंजनासाठी स्विमींगपूल इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत.